मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ७७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, बेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » मंगळवार, १५ एप्रिल २०२५ » वर्ष: ६ » अंक:११७ » पाने-८ » किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## रिक्षाचालकाने लाखोंचे दागिने केले परत

**पिंपरी, दि. १४ प्रतिनिधी**

प्रवासी महिला रिक्षातून प्रवास करताना पावणे सात लाख रुपयांचे दागिने असलेली बॅग रिक्षामध्ये विसरली. मात्र प्रामाणिक रिक्षा चालकाने ती बॅग पोलिसांमार्फत संबंधित प्रवासी महिलेला परत केली. ही घटना नेवाळेवस्ती चिखली येथे घडली. नेवाळेवस्ती येथील प्रतिभा काळे यांनी नेवाळेवस्ती येथून चिखली गाव येथे रिक्षाने प्रवास केला. चिखली गाव येथे उतरल्यानंतर रिक्षामध्ये त्यांची सोने असलेली पर्स विसरली असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ चिखली पोलिसांकडे धाव घेतली. प्रतिभा काळे यांना संबंधित रिक्षाचा क्रमांक माहिती नसल्याने रिक्षा चालकाचा शोध घेणे पोलिसांसमोर आव्हान होते. पोलिसांनी नेवाळे वस्ती येथील रिक्षा स्टॉप वरून चिखली गाव दरम्यानच्या मार्गावरील वीस सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पाहणी केली. त्यामधून प्रतिभा काळे यांनी प्रवास केलेल्या रिक्षाचा नंबर पोलिसांनी मिळवला. त्यानंतर संबंधित रिक्षा चालक बाळू जाधव (चिखली) यांची पोलिसांनी भेट घेतली. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी संबंधित बॅग सुरक्षित ठेवली असल्याचे सांगितले. तसेच दागिने असलेली बॅग रिक्षाचालक बाळु जाधव यांनी पोलिसांना परत केली. पोलिसांनी प्रामाणिक रिक्षाचालक बाळू जाधव यांचा सत्कार केला.

अग्राग्रलेख

**खरीखरी**

## युद्धखोरी की शांतता

काल जागतिक पटलावर दोन मोठ्या घटना घडल्या. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना शांतीदूत बनायचे आहे. त्यामुळे रशिया आणि इस्राइल यांनी प्रतीपक्षावर हल्ले करूच नयेत, असे ट्रम्प यांना वाटते. पण मुजोर इस्राइल आणि शिरजोर रशिया सध्या तरी कोणाचे एकायच्या मनस्थितीत नाहीत असेच दिसते. इस्राइलने चक्क गाझातील रुग्णालयांवर हल्ला केला. तीन रुग्णालयांवर क्षेपणास्त्रांचा मारा केल्यामुळे काही आरोग्य अधिकारी ठार झाले आहेत. तर काही नागरिक जखमी झाले आहेत. तिकडे रशियाने युक्रेनवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली. युक्रेनच्या सुमी नावाच्या शहरातील वसाहतींवर रशियाने क्षेपणास्त्रे डागून वीस नागरिकांना ठार केलेले आहे. अनेक जण जखमी आहेत. म्हणजे आता ही दोन युद्धखोर राष्ट्रे आक्रमक आणि अनिर्बंध झालेली आहेत असे दिसते. इस्राइल हे अमेरिकेचे अत्यंत लाडके बाळ आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेत ज्यू लोकांचा मोठाच दबदबा आहे. त्यामुळे ट्रम्प कितीही शांततेचा राग आळवत असले. तरी इस्राइलला वाऱ्यावर सोडणे, अमेरिकेला अजिबात जमणार नाही हे खरे आहे. इस्राइलचे सरळसरळ म्हणणे आहे, 'आम्हाला हमासला संपवायचे आहे'. हमासला संपवण्यासाठी जिथे त्यांचा तळ आहे. त्या राफाहला त्यांनी चारी बाजूने वेढा घातलेला आहे. गाझाच्या जनतेने आपल्या भागातून हमासला हकलून देण्याची हीच वेळ आहे, असे इस्राइलचे म्हणणे आहे. हमासने आमच्या सर्व ओलिसांना मुक्त केले. तरच आम्ही युद्धविरामाची घोषणा करू. अन्यथा हल्ले सुरूच राहतील, असे इस्राइलचे म्हणणे आहे. तिकडे रशियाने युक्रेनच्या शहरांवर हल्ला केलेला आहे. युक्रेनला अमेरिकेच्या अध्यक्षांनी अगदी वाऱ्यावर सोडले असले. तरी युरोपियन देश मदत करीत आहेत. त्यामुळेच की काय रशियाला अजूनही विजय दृष्टीपथात येत नाही असे दिसते. त्यामुळे रशियाने आता नागरी वसाहतींवर हल्ले सुरू केलेले आहेत. रशियाच्या लष्कराने वसाहतींवर क्षेपणास्त्र डागून सामान्य जनतेला आता युद्धात ओढण्याचे ठरवलेले आहे. युक्रेन मधील भारतीय औषध कारखान्यांवरही रशियाने ड्रोनद्वारे हल्ला केला आहे. बदलत्या जागतिक परिस्थितीमध्ये इस्रायलचे आक्रमक धोरण आणि रशियाही मोठी झेप घेण्याच्या तयारीत दिसत आहेत. मात्र हे दोन्ही देश परत युद्ध खोरीकडे वळत आहेत. तरीही भारताने नेहमीच शांततेचा पुरस्कार केला आहे. आपले पंतप्रधान रशियाला भेट देऊन आले. पण त्यांच्याही सूचनांचे रशियाने पालन केलेले नाही. सध्याची जागतिक परिस्थिती सुद्धा या लढाईला फारसा प्रतिसाद देईल असे वाटत नाही. ट्रम्प यांना अमेरिकेवरील बलाढ्य कर्ज कमी करायचे आहे. त्यामुळे त्यांनी अमेरिकेतून फुकाच्या हजामती करण्यावर बंदी आणली आहे. आपल्या तुटपुंज्या सामग्रीनिशी युक्रेन अजूनही मस्तपैकी रशियाच्या मोठमोठ्या हल्ल्यांना उत्तर देत आहे. जागतिक शांततेसाठी भारताचे धोरणात्मक निवेदन पंतप्रधानांनी दोन्हीही युद्धजन्य राष्ट्राध्यक्षांकडे केलेले होते. या सर्व गुंतागुंतीच्या प्रकारामुळे भविष्यात जगावर युद्धखोरी लादली जाईल, असे दिसते आहे. एकूण सर्व परिस्थिती बघता शांतता बरीच दूर आहे. असे म्हटले तर ते काही वावगे ठरणार नाही. तरीही आपण शांततेसाठी प्रार्थना नक्कीच करू शकतो. एवढेच आपण ध्यानात ठेवले पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

## मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक

**ब्रुसेल्स, दि. १४ वृत्तसंस्था**

फरार हिरेव्यापारी आणि १३,८५० कोटी रुपयांच्या पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील प्रमुख आरोपी मेहुल चोक्सी याला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) आणि सक्तवसुली संचालनालय (ईडी) या भारतीय तपास यंत्रणांच्या विनंतीनंतर बेल्जियमच्या अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली. मेहुल चोक्सी विरुद्ध मुंबईतील न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. त्यानंतर त्याला आता अटक केली आहे.

पीएनबी बँकेत १३ हजार कोटींचा घोटाळा करून मेहुल चोक्सी देश सोडून पळाला होता. २०१८ पासून फरार असलेल्या चोक्सीला १२ एप्रिल रोजी बेल्जियममधील एका रुग्णालयातून ताब्यात घेण्यात आले. तो तिथे उपचार घेत आहे. भारतीय अधिकाऱ्यांनी त्याच्या प्रत्यार्पणाबाबत प्रयत्न केल्यानंतर काही दिवसांताच त्याला अटक करण्यात आली. ईडी आणि सीबीआयने त्यांच्या प्रत्यार्पणासाठी जोर लावल्यानंतर लगेचच प्रकृती बिघडल्याचे कारण देत तो युरोपला गेला होता, असे सूत्रांनी सांगितले. बेल्जियम पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले तेव्हा तो रुग्णालयात उपचार घेत होता.



सध्या त्याला बेल्जियममधील एका डिटेंशन सेंटरमध्ये ठेवण्यात आले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून त्याचे बेल्जियमध्ये वास्तव्य आहे, असेही सूत्रांनी सांगितले. काही रिपोर्टनुसार, त्यांची प्रकृती खालावली चालली असून त्यांच्यावर रक्ताच्या कर्करोगावर उपचार सुरू आहेत. जेव्हा चोक्सीला अटक करण्यात आली तेव्हा तो पुढील वैद्यकीय उपचारांसाठी बेल्जियमहून स्वित्झर्लंडला जाण्याचा तयारीत होता. सप्टेंबर २०२४ मध्ये ईडी आणि सीबीआयने प्रत्यार्पणासाठी विनंती अर्ज सादर केल्यानंतर त्याच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली. त्यावेळी, चोक्सीच्या वकिलांनी असा दावा केला की तो रक्ताच्या कर्करोगाने त्रस्त असून त्याला प्रवास करता येणार नाही.

मेहुल चोक्सीचे भारताकडे प्रत्यार्पण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, चोक्सी आता आपला बचाव करण्यासाठी कायदेशीर मार्ग शोधत आहे. त्याच्या वकिलांनी असा दावा केला आहे की त्याच्या प्रत्यार्पणाला विरोध करण्यासाठी वैध कारणे आहेत. त्यात त्याची आरोग्याची स्थिती हे एक कारण आहे.

बंगळूर येथील उद्योजक हरीप्रसाद एस व्ही यांनी २०१६ मध्ये मेहुल चोक्सीच्या कथित गैरव्यवहाराबद्दल पीएमओला माहिती दिली होती. आता चोक्सीच्या अटकेवर प्रतिक्रिया देताना हरिप्रसाद एसव्ही म्हणाले, " चोक्सीला अटक होणे ही खूप चांगली बातमी आहे. भारतात मेहुल चोक्सीने ज्या लोकांना फसवले त्या सर्व लोकांसाठी ही खूप आनंदाची गोष्ट आहे. त्याला बेल्जियममध्ये कसे पकडले, हे अविश्वसनीय आहे. त्याला केवळ भारतात परत आणणेच नव्हे तर त्याने लुटलेले पैसेदेखील परत मिळवणे महत्त्वाचे आहे, भारताला याचीच गरज आहे."

मेहुल चोक्सी आणि नीरव मोदी यांच्यावर मुंबईतील पंजाब नॅशनल बँकेच्या ब्रॅडी हाऊस शाखेत १३,८५० कोटींच्या घोटाळ्याचा आरोप आहे. यापूर्वी, चोक्सीने त्याचा पासपोर्ट निलंबित झाल्यामुळे तो भारतात येऊ शकत नसल्याचे कारण पुढे केले होते. त्याने २०१८ मध्ये भारतातून पळून जाण्यापूर्वी २०१७ मध्येच ॲंटिग्वा-बार्बुडाचे नागरिकत्व घेतले होते. मेहुलने प्रकृती बिघडल्याचे कारण देत भारतात येण्यास वारंवार नकार दिला आहे. कधीकधी तो केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे समोर येतो. भारतातील त्याच्या अनेक मालमत्ताही जप्त करण्यात आल्या आहेत.

## सुधारित वक्फ कायद्यामुळे गरिबांची लूट थांबेल, वक्फच्या पवित्र भावनेचा सन्मान होईल- पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

सुधारित वक्फ कायदा कायद्यामुळे गरिबांची होणारी लूट थांबेल. देशातील कोणत्याही भागातील आदिवासींच्या जमिनी अथवा मालमत्तेला वक्फ बोर्ड हात लावू शकणार नाही, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पीएम मोदी यांनी आज सोमवारी हरियाणातील हिसार ते अयोध्या दरम्यानच्या विमानसेवेला हिरवा झेंडा दाखवला. तसेच त्यांच्या हस्ते हिसारच्या महाराजा अग्रसेन विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणीदेखील झाली. यावेळी संबोधित करताना पीएम मोदी बोलत होते.



सुधारित वक्फ कायदा ८ एप्रिल रोजी देशभरात लागू झाला. त्याआधी ५ एप्रिल रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाला मंजुरी दिली होती. त्यापूर्वी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी हे विधेयक मंजूर केले होते.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी म्हणाले, "वक्फच्या नावावर लाखो हेक्टर जमीन आहे. जर वक्फ मालमत्तेचा लाभ गरजूंना दिला असता तर त्यांना त्याचा फायदा झाला असता. पण या मालमत्तेचा भूमाफियांनी फायदा घेतला. या सुधारित वक्फ कायद्यामुळे गरिबांची होणारी लूट थांबेल. वक्फच्या पवित्र भावनेचा सन्मान होईल. मुस्लिम समाजातील गरीब आणि पसमांदा परिवार, महिला, विशेषतः मुस्लिम विधवा आणि मुलांना त्यांचे हक्कदेखील मिळतील. त्यांच्या हक्कांचेही रक्षण होईल. हा खरा सामाजिक न्याय आहे."

काँग्रेसने केवळ काही कट्टरपंथियांना खूश केले. उर्वरित समाज मागास, अशिक्षित आणि गरीब राहिला. काँग्रेसच्या या वाईट धोरणाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे वक्फ कायदा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे स्वप्न पाहिले होते, त्यांनी संविधानात सामाजिक न्यायाच्या तरतुदीवर जी तरतूद केली होती, त्यावर काँग्रेसने वार करुन संविधानातील तरतुदींना तुष्टीकरणाचे साधन बनवले, अशी जोरदार टीका पीएम मोदी यांनी काँग्रेसवर केली.

काँग्रेसने आमच्या पवित्र संविधानाला सत्ता मिळविण्यासाठी शस्त्र बनवले. जेव्हा जेव्हा काँग्रेसवर सत्तेचे संकट ओढवले तेव्हा त्यांनी संविधान मोडले. काँग्रेसने बाबासाहेब यांच्याबाबतीत काय केले? हे आपण विसरू नये. जोपर्यंत बाबासाहेब हयात होते तोपर्यंत काँग्रेसने त्यांचा अपमान केला. त्यांना दोनदा निवडणुकीत हरवले. काँग्रेसने त्यांच्या स्मृती पुसून टाकण्याचा प्रयत्नही केला. काँग्रेसला बाबासाहेबांचे विचार कायमचे संपवायाचे होते. डॉ. आंबेडकर हे संविधानाचे रक्षक होते, पण काँग्रेस संविधानाचा भक्षक बनली, अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

## मुंबई टँकर असोसिएशनचा संप मागे

**मुंबईतील पाणीटंचाईवर अखेर तोडगा**

**मुंबई, दि. १४ प्रतिनिधी**



मुंबईतील टँकर चालकांचा संप अखेर मागे घेण्यात आला आहे. मुंबई टँकर असोसिएशने हा संप मागे घेत असल्याचे जाहीर केले आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार मुरजी पटेल यांच्या मध्यस्तीनंतर मुंबई टँकर असोसिएशने हा निर्णय घेतला. गेले पाच दिवस मुंबईतील टँकर चालकांचा संप सुरु होता. त्यामुळे मुंबईतल्या काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर समस्यांना तोंड द्यावे लागत होते. अखेर मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिलेल्या आश्वासनानंतर टँकर असोसिएशने संप मागे घेतल्याचे जाहीर केले.

मुंबईतील खासगी विहिरी आणि बोअरवेल मालकांना केंद्रीय भूजल प्राधिकरणाची परवानगी सादर करण्याबाबत मुंबई महापालिकेने नोटीस बजावल्याच्या विरोधात टँकर मालकांच्या संघटनेने गेल्या पाच दिवसांपासून संप पुकारला होता. या संपाचा मुंबईतील गृहनिर्माण सोसायटी, कार्यालये, बांधकाम व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याप्रकरणाची दखल घेत संप मिटवण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर सोमवारी सकाळी पालिका आयुक्तांसोबत झालेल्या बैठकीनंतर भूषण गगराणी यांनी कोणतीही कारवाई केली जाणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे आता मुंबई टँकर असोसिएशने संप मिटवला आहे.

"मुंबई महापालिकेकडून देण्यात आलेल्या नोटिसा मागे घेण्यात येत आहेत. यापुढे टँकर असोसिएशनच्या कुठल्याही सदस्याला त्रास होणार नाही याची ग्वाही मुंबई पालिकेच्या आयुक्तांनी दिली आहे. टँकर चालकांना जो दंड आकारला जातो त्यासंदर्भात आम्ही पोलीस आयुक्तांना जाऊन भेटणार आहोत," असे आमदार मुरजी पटेल यांनी म्हटलं. दरम्यान, विहीर मालकांना पाठवलेल्या नोटिसांना महापालिकेने स्थगिती दिल्यानंतरही टँकर संघटनेने बंद सुरूच ठेवला होता. त्यामुळे काही सोसायट्या, हॉटेल्स आणि बांधकामांच्या ठिकाणी पाणीटंचाई निर्माण झाली होता. त्यावर तोडगा काढण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार सर्व प्रकारचे खासगी टँकर्स, विहिरी, बोअरवेल ताब्यात घेण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. मात्र आता त्याआधीच संप मिटवण्यात आला आहे.

## एका रक्ताची चार माणसे घरात असतील तरी भांड्याला भांडे लागते- चंद्रकांत पाटील

**मुंबई, दि. १४ प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त चैत्यभूमी येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्ण यांचं भाषण झालं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नावे भाषणातून वगळण्यात आली. त्यामुळे दोन्ही उपमुख्यमंत्री नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे उच्च-तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी याबाबत महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. एका रक्ताची चार माणसं घरात असतील तर भांड्याला भांड लागतंच, असं चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत. महायुतीमधील कथित विसंवादावर चंद्रकांत पाटील यांनी भाष्य केलं आहे. खळखळ असेल तर ते जिवंतपणातं लक्षण आहे, तसेच एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची पार्श्वभूमी वेगळी असल्याचं चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत.

"महायुतीमध्ये खूप आलबेल आहे. खूप समन्वयाने चालले आहे. एका रक्ताची चार माणसं घरात असतात. तिथेही भांड्याला भांडे लागतात. इथे तर वेगवेगळ्या पार्श्वभूमीची माणसं आहेत. अजित दादांची वेगळी पार्श्वभूमी, एकनाथ शिंदे यांची वेगळी, देवेंद्र फडणवीस यांची वेगळी, अशी वेगवेगळ्या पार्श्वभूमीची लोकं एकत्र काम करतात त्यावेळी खळखळ नाही झाली तर हलवून बघायला लागेल जिवंत आहेत की गेले आहेत. खळखळ आहे याचा अर्थ ते जिवंत आहेत. खळखळ आहेत याचा अर्थ ते आपली कळकळ व्यक्त करतात. व्यक्त नाही केलं तर माणूस आजारी पडतो. त्यामुळे व्यक्त करायचं असतं", अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नुकतेच महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त रायगड येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून एनवेळी एकनाथ शिंदे यांना भाषणाची संधी देण्यात आली होती. या घटनेची सर्वत्र चर्चा होत असतानाच आज चैत्यभूमी येथे देखील तशीच घटना घडली.

कार्यक्रम पत्रिकेत भाषणासाठी नाव असतानादेखील एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचं नाव भाषणातून वगळण्यात आलं. विशेष म्हणजे शिंदे आणि अजित पवार यांच्या भाषणाची पत्रिका ऐनवेळी रात्री बदलण्यात आल्याची देखील माहिती नंतर समोर आली आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना भाषणाची संधी न दिल्यामुळे दोन्ही नेते नाराज असल्याची चर्चा आहे. चैत्यभूमी येथील कार्यक्रमानंतर एकनाथ शिंदे ठाण्याला निघून गेले. तिथे त्यांनी पत्रकार परिषद घेतली. पण त्यांनी आपल्या नाराजीच्या चर्चांचं खंडन केलं.

## आपला देश हळूहळू हिटलरशाहीकडे वळवला जातो आहे- प्रणिती शिंदे

**मुंबई, दि. १४ प्रतिनिधी**

बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला प्रणिती शिंदेंनी अभिवादन केले. त्यानंतर प्रणिती शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी भाजपावर हे आरोप केले आहेत. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान आणि लोकशाही निर्माण केली आहे. संविधान आपण वाचवलं पाहिजे. जेव्हा सत्ताधाऱ्यांचे विचार हे बाबासाहेबांच्या विरोधात आहेत, जेव्हा देशाचे गृहमंत्री म्हणतात की संविधान संविधान संविधान हे अभी फॅशन बन गया है, जर संविधान आणि बाबासाहेबांचा असा तिरस्कार केला जात असेल, तर ही प्रत्येकाची जबाबदारी आहे की, लोकशाहीची चळवळ जिवंत ठेवली पाहिजे. भाजपने जेव्हा ४०० पारचा नारा दिला होता, तेव्हा कोणाला माहिती होतं की, संविधान बदलण्यासाठी त्यांनी हा नारा दिला होता, पण त्यांचे पितळ उघडं पडले पडले. बाबासाहेबांना मानणारे जोपर्यंत आहेत, तो पर्यंत संविधानाला आम्ही हात काय बोट पण लावू देणार नाही. बाबासाहेब हे केवळ आपल्या देशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी होते ही बाब विसरता येणार नाही असंही प्रणिती शिंदे म्हणाल्या. प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या, “जिथे हिटलरशाही आहे अमेरिका, रशिया किंवा आपला देश. सगळीकडे हिटलरशाही चालू आहे. त्या ठिकाणी बाबासाहेबांचे विचार महत्त्वाचे आहेत. संविधानाने दिलेले अधिकार हिसाकावून घेतले जात आहेत. आचार्य अत्रेचा काळ होता, जिथे प्रत्येक राज्यकर्त्यांचा बाबतीत ते विनोद करायचे. त्यावेळेस त्यांच्यावरती या थराला जाऊन कधी कोणी काहीही केले नाही. पण आता हे व्यासपीठ राहिलेले नाही, जे व्यासपीठ बाबासाहेबांनी दिलं ते राहिलंच नाही, असेही त्या म्हणाल्या.

## सलमान खानला पुन्हा जीवे मारण्याची धमकी

**मुंबई, दि. १४ प्रतिनिधी**



बॉलीवूडचा भाईजान सलमान खानला पुन्हा जीवे मारण्याची धमकी मिळालीय. मुंबईतील वरळी ट्रॅफिक डिपार्टमेंटच्या व्हॉट्सॲप नंबरवर एका अज्ञाताने धमकी दिल्याचे वृत्त समोर आले आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सलमान खानच्या गाडीला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देखील मिळालीय.

सलमान खानच्या मागे दीर्घकाळ लॉरेन्स बिश्नोई पडला आहे. अनेकदा जीवे मारण्याची धमकी देखील मिळाली आहे. त्याच्या घरी गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाहेर गोळीबार देखील झाला होता. आता सलमान खानला पुन्हा एकदा घरात घुसून मारण्याची धमकी मिळाली आहे. सोबतच त्याची कार बॉम्बने उडवण्याची धमकी देखील मिळालीय.

सलमानने त्याच्या ‘सिकंदर’ चित्रपटाच्या प्रमोशन वेळी धमक्यांविषयी उघडपणे सांगितले होते. त्याने सांगितले होते की, भगवान, अल्लाह वर सर्व काही आहे. जितकं जगणे लिहिलंय, तितकं जगेन. परंतु, तो आपल्या परिवाराच्या सिक्युरिटी मुळे खूप चिंतेत राहतो. हेच कारण आहे की, यावेळी तो ईदला जेव्हा बाल्कनीमध्ये येऊन लोकांना शुभेच्छा दिल्या, त्यावेळी तो फुल प्रूफ सिक्युरिटी सोबत दिसला होता.

## “ते फक्त काड्या करतात”, चंद्रकांत खैरे अंबादास दानवेंवर संतापले

**छ.संभाजीनगर, दि. १४ प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. दोघांकडूनही एकमेकांवर टीका करण्यात येत असल्यामुळे आता छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ठाकरे गटातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे. आता अंबादास दानवे यांनी बोलवलेल्या पक्षाच्या मेळाव्याला चंद्रकांत खैरे हे उपस्थित न राहिल्याने पुन्हा एकदा हा वाद चर्चेत आला आहे.

आपल्याला मेळाव्याला बोलवण्यात आलच नव्हतं, असा दावा चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. तसेच आपल्याला मेळाव्याला बोलवण्यात आलं नाही, त्यामुळे याबाबत आपण उद्धव ठाकरे यांच्याकडे तक्रार करणार असल्याचं चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं आहे. ‘अंबादास दानवे हे स्वत:ला खूप मोठं समजतात. पण त्यांचं पद आणखी दोन ते चार महिनेच आहे. ते फक्त काड्या करतात’, अशी टीका चंद्रकांत खैरे यांनी केली आहे. यावेळी चंद्रकांत खैरे हे अंबादास दानवे यांच्यावर चांगलेच संतापल्याचं पाहायला मिळालं. दरम्यान, यावरून छत्रपती संभाजीनगरमधील ठाकरे गटातील वाद विकोपाला गेल्याची चर्चा रंगली आहे.



“मला अंबादास दानवे यांनी मेळाव्याबाबत सांगितलं नाही. मी आता याबाबत उद्धव ठाकरे यांच्याकडे तक्रार करणार आहे. अंबादास दानवे हे स्वत:ला खूप मोठं समजतात. मात्र, आता किती आणखी दोन ते चार महिनेच त्यांचं पद आहे, मग त्यांचं पद जाणार आहे. अंबादास दानवे यांच्याबाबत मी तक्रार करणार आहे. परवा आमची बैठक आहे, तेव्हा मी सर्व सांगणार आहे”, असे चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं आहे.

“तुम्ही आम्हाला काय समजता? कचरा समजता का? शिवसेना मी वाढवली. जेलमध्ये गेलो, लाठ्या खाल्या, काठ्या खाल्या. मग तुम्ही काय केलं? साहेबांच्या आशीर्वादाने आम्ही मंत्रिपदापर्यंत पोहोचलो. मग नंतर ते (अंबादास दानवे ) आलेले आहेत. नंतर येऊन काय केलं? फक्त काड्या करण्याचं काम केलं. मला हे अजिबात आवडत नाही. मला पक्षातून कोणी काढू देखील शकत नाही. कारण मी बाळासाहेब ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक आहे. आंदोलनात माझा सहभाग आहे, माझ्या पक्षासाठी मी काहीही करेन. अंबादास दानवे मला बोलवत नाही. मी माझ्या पद्धतीने करेन, माझं आंदोलन माझ्या पक्षाचं असेल. अंबादास दानवे यांचं आंदोलन असेल, नसेल मला काही माहिती नाही”, असं चंद्रकांत खैरे यांनी म्हटले.

“चंद्रकांत खैरे हे नागपूरला त्यांच्या समाजाचा मेळावा होता, ते तिकडे गेले होते. आता ते मागच्या काळात माझ्यावर काय-काय बोलले? तरी मी उत्तर दिलं का? उत्तर देणार पण नाही. मी त्यांचं नाव कार्यक्रम पत्रिकेत टाकलं होतं, पण ते नाही आले. त्याला मी काय करू शकतो?”, असं अंबादास दानवे यांनी म्हटलं आहे.

## सध्या कोणी संपर्कात नाही, आमच्या भेटीगाठी विकासासाठी - बावनकुळे

**नागपूर, दि. १४ प्रतिनिधी**

राजकीयदृष्ट्या सध्या कुणी संपर्कात नाही. विकासाच्या कामासाठी आमदार आणि खासदार सरकारकडे, माझ्याकडे तसेच मुख्यमंत्री आणि आमच्या दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे येत असतात. त्याचा अर्थ ते राजकीयदृष्ट्या संपर्कात आहेत, असा होत नाही, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा संकल्प करताना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानाला नतमस्तक होऊन विकसित भारताचा संकल्प केला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील विकसित महाराष्ट्राला पुढे नेताना आणि देशात प्रथम राज्य करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान समोर ठेवले आहे.

महाराष्ट्राच्या प्रत्येक घरी संविधानाची उद्देशिका असली पाहिजे. समाज कल्याण विभाग, जिल्हा नियोजन समितीच्या वतीने नागपूर जिल्ह्यामध्ये संविधानाच्या उद्देशिका वाटप करण्यात येणार आहे. आज आम्ही उद्घाटन करतोय आजपासून पुढच्या महिन्याभर नागपूर जिल्ह्याच्या प्रत्येक घरी आपण ज्याच्या उद्देशिका घरोघरी पोहोचेल. मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय घेतला असून हा उपक्रम सुरू करणारा नागपूर जिल्हा राज्यात पहिला ठरला आहे.

**अमित शहा आणि एकनाथ शिंदे भेट राजकीय नाही**

काहीतरी कपोलकल्पित बातम्या आहेत. कोणतीही भेट राजकीय विषयावर झालेली नाही. त्यामुळे अमित शहा यांची भेट राज्याच्या विकासाकरता असते. इतिहास, सांस्कृतिक कामाकरता मुंबईच्या या दौऱ्याला महत्त्व आहे. कोणी भाषण दिल्याने मोठा होत नाही आणि कुणी भाषण दिले नाही म्हणून लहान होत नाही. आम्ही भाषणामुळे नाराज होणारे नेते नाहीत.

दरम्यान, मंत्री चंद्रकांत पाटील काय बोलले, मला माहित नाही. आज महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयंती उत्सव आहे. राजकीय भाष्य आपण सगळ्यांनी टाळलं पाहिजे, असे म्हणत बावनकुळे यांनी काढता पाय घेतला.

## वाल्मीक कराडचा एन्काऊंटर करण्याची ऑफर

## निलंबित पोलीस अधिकाऱ्याचा खळबळजनक दावा

**बीड, दि. १४ प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती असा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला आहे. रणजीत कासले हे बीडच्या सायबर विभागात पोलीस निरीक्षक होते. मागील काळात त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यानंतर कासले यांनी अनेक दावे त्यांच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून केले आहेत. त्यात वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरच्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.

रणजीत कासले यांनी व्हिडिओ पोस्ट करत म्हटलंय की, मी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरची बातमी पाहिली. या ५ पोलिसांवर गुन्हे दाखल करा आणि एसआयटी बसवा असं कोर्टाने म्हटलं. एसआयटी बसवून काही उपयोग होणार नाही. जर चौकशी करायची असेलच तर केंद्राची यंत्रणा बसवा, मग त्यातून सत्य बाहेर पडेल. फेक एन्काऊंटर कसे होतात हे मी सांगतो. ज्यावेळी मला वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर दिली होती पण मी नकार दिला. एन्काऊंटरसाठी मोठी रक्कम ऑफर दिली जाते, १०, २०, ५० कोटी इतके दिले जातात. तुम्ही बोलाल तेवढे पैसे देतात. मी सायबर शाखेत होतो, पण मी हे करू शकतो हे माहिती असल्याने त्यांनी मला ऑफर दिली होती असं त्यांनी सांगितले.



तसेच मी मोठेपणा सांगत नाही. परंतु फेक एन्काऊंटर करताना ४ लोकांची टीम असते, त्यात मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृह सचिवांची गुप्त बैठक होते. त्यात काय करायचे हे ठरते. मग त्यानंतर ५-६ विश्वासू लोकांची टीम बनते. ती संबंधित ठिकाणी जाते, म्हणजे अक्षय शिंदे याचे झाले तसे, तिथे १ अधिकारी, २-३ अंमलदार अशी आणखी एक टीम तयार केली जाते. त्यांना ५,१०, १५ कोटी मोठी रक्कम एकाच वेळी दिली जाते. त्यानंतर या घटनेची चौकशी आपलेच सरकार करेल, त्यातून तुम्हाला मुक्त करू अशी वचने दिली जातात अशाप्रकारे बोगस एन्काऊंटर घडवून आणले जातात हा दावा निलंबित पोलीस अधिकारी रणजीत कासले यांनी केला.

दरम्यान, आरोपीच्या हातात बेड्या असतात. त्याशिवाय दोरखंडाने हात-पाय बांधलेले असतात. अक्षय शिंदे याचा एन्काऊंटर किती बोगस होता असंही रणजीत कासले यांनी सांगितले. बीड पोलीस दलात रणजीत कासले कार्यरत होते. त्यांचे निलंबन झालं असून त्यानंतर ते अनेक व्हिडिओ सोशल मीडियात टाकत असतात. त्यातच वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर होती हा दावा केल्यानं बीड जिल्ह्यात प्रशासनात खळबळ उडाली आहे. फक्त वाल्मीक कराड नव्हे तर इतर आरोपींचा फेक एन्काऊंटर कसा केला जातो हेदेखील कासले यांनी व्हिडिओ पोस्ट करत गंभीर दावा केला आहे.

## महत्त्वाचे

### नोटेवर चित्र रेखाटून केले महामानवाला अभिवादन

**नाशिक ।** भाटगाव ता.चांदवड येथील





कलाशिक्षक देव हिरे यांनी एक रुपयाच्या नोटेवर पेन्सिलच्या सहाय्याने डॉ.बाबासाहेबांचे चित्र रेखाटून जयंती निमित्त अनोखे अभिवादन केले आहे. १४ एप्रिल २०२५ आपल्या पेनाच्या ताकदीवर न्याय, समता, बंधुता मिळवून देणारा सर्वांना शिकण्याचा हक्क आणि न्याय मिळवण्याची ताकद देऊन गुलामगिरीच्या अंधारातून उज्वल प्रकाश दाखविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती आहे. गरीब, दीन, दलित, पीडित आणि खचलेल्या समाजातील सर्वांच्या जीवनात आपल्या शिक्षण व बुद्धीच्या जोरावर ज्यांनी ऐश्वर्य आणलंत्या बाबासाहेबांची प्रतिमा चलनी नोटांवर किती शोभून दिसेल, या कल्पनेतून कलाशिक्षक देव हिरे यांनी पेन्सिलने एक रुपयाच्या नोटेवर हे चित्र साकारून बाबासाहेबांना जयंती निमित्त अनोखे अभिवादन केले आहे.

### क्रेडाई नाशिक मेट्रोची नूतन कार्यकारिणी घोषित

**अध्यक्षपदी गौरव ठक्कर तुषार संकलेचा मानद सचिव**

**नाशिक ।** क्रेडाई नाशिक मेट्रोच्या वर्ष २०२५ ते २०२७ साठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये अध्यक्षपदी गौरव ठक्कर यांची तर मानद सचिव म्हणून तुषार संकलेचा यांची निवड करण्यात आली. सर्वसाधारण सभेत ही घोषणा करण्यात आली. निवड समितीमध्ये माजी अध्यक्ष जितुभाई ठक्कर आणि अनंत राजेगावकर यांचा समावेश होता. क्रेडाई नाशिक मेट्रो वर्ष २०२५ ते २०२७ ची कार्यकारणी पुढीलप्रमाणे आहे. अध्यक्ष : गौरव ठक्कर, मानद सचिः तुषार संकलेचा, आयपीपी- कृणाल पाटील, उपाध्यक्ष : अनिल आहेर, मनोज खिवंसरा, अंजन भालोदिया, उदय घुगे, कोषाध्यक्ष : श्रेणिक सुराणा, सहसचिव : सचिन बागड, नरेंद्र कुलकर्णी, ऋषिकेश कोते, हंसराज देशमुख. समिती सदस्य पुढीलप्रमाणे आहेत. श्यामकुमार साबळे, अनंत ठाकरे, विजय चव्हाणके, सागर शाह, निशित अटल, सुशील बागड, निरंजन शाह, वृषाली हिरे, दीपाली बिरारी, सहयोगी सदस्य : सतीश मोरे, सुशांत गांगुर्डे, अभिषेक महाजन, समीर सोनवणे आदी. आमंत्रित सदस्य : मनोज लडानी, हर्षल हणमंते, ;भूषण कोठावदे, शिवम पटेल, हिरेन भडजा, मयुरेश चौधरी, ऋषभ तोडरवाल या बरोबर विविध समित्यांचे १३ सहसमन्वयक आणि क्रेडाई युवा विंग समन्वयक आदित्य भातंबरेकर आणि सहसमन्वयक अजिंक्य नाहार यांच्यासोबत १५ सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली.

# एकतेची शिकवण रुजवणाऱ्या डॉ.आंबेडकर यांचे कार्य दिशादर्शक : संतोष गायधनी



नासाका विद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी अभिवादन करताना युवावक्ते संतोष गायधनी, वडगाव पिंगळाचे पोलीस पाटील सागर मुठाळ, सागर गायधनी, मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी.

**नाशिकरोड ।** गौतम बुद्ध, शिवराय, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ.आंबेडकर अशा महामानवांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची शिकवण आपल्याला दिली. एकतेची शिकवण समाजात रुजवणाऱ्या डॉ.आंबेडकर यांचे कार्य दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन युवावक्ते संतोष गायधनी यांनी केले.

पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालय आणि आदर्श प्राथमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मंचावर वडगाव पिंगळाचे पोलीस पाटील सागर मुठाळ, सागर गायधनी, मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी, सांस्कृतिक विभागप्रमुख कैलास लहांगे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

श्री गायधनी पुढे म्हणाले की, डॉ.आंबेडकर हे जगातील सर्वात विद्वान महामानव. उत्तमतेचा ध्यास घेत अनेक भाषांमध्ये पारंगत असलेल्या आंबेडकरांनी प्रयत्नवाद आणि विज्ञानवाद याची सांगड घालून उत्तम कार्य केले. संविधानाच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीला अधिक बळकट करणाऱ्या आंबेडकरांचे विचार हे म्हणूनच अतिशय महत्त्वाचे आहेत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पोलीस पाटील संघटनेच्या सिन्नर तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर मुठाळ यांचा सन्मानचिन्हे आणि ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मुठाळ यांनी आपल्या जडणघडणीसह नेतृत्वगुण विकसित करण्यात शाळेचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. ईशान सानप, ईश्वरी गिते, सृष्टी सरोदे या विद्यार्थ्यांनी डॉ.आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावर विचार मांडले. दीपाली राठोडसह धन्वंतरी गायधनी आणि सहकारी विद्यार्थिनींनी गाणी सादर केली. मुख्याध्यापक अरुण पगार यांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविधांगी कार्याबद्दल मार्गदर्शन केले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## असोसिएशन ऑफ फिजिशियन्स नाशिक संघटनेचा पदग्रहण सोहळा संपन्न





**नाशिक ।** असोसिएशन ऑफ फिजिशियन्स नाशिक या संघटनेचा पद्ग्रहण सोहळा नुकताच नाशिक येथे संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. समीर चंद्रात्रे यांनी अध्यक्षपदाची, डॉ. प्रितम अहिरराव यांनी सचिव पदी तर डॉ. राहुल पाटील यांनी खजिनदार पदाची सुत्रे हाती घेतली.

या कार्यक्रमास मुंबई येथील प्रसिध्द डॉ. विजय पनीकर व डॉ. विजय नेगलूर हे प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायण देवगांवकर होते. सदर कार्यक्रमात डॉ. विजय पनिकर व डॉ. विजय नेगलूर यांनी संघटनेच्या नवीन कार्यकारीणीस व उपस्थित डॉक्टरांसाठी प्रोत्साहपर मार्गदर्शन केले. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. समीर चंद्रात्रे यांनी पुढील कालावधीत असोसिएशनतर्फे डॉक्टरांसाठी ज्ञान संवर्धनात्मक व सामान्य जनतेसाठी आरोग्य संवर्धन मार्गदर्शनपर विविध कार्यक्रम करण्याचे घोषीत केले. संघटनेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष डॉ. समीर पेखळे यांनी संघटनेच्या सर्व कार्यकारिणी व फिजिशियन्स यांनी एकत्र येऊन संघटनेसाठी आणि समाजासाठी कार्य करावे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुवर्ण तांबडे व डॉ. राजश्री धोंगडे यांनी केले. आभार डॉ. प्रितम अहिरराव यांनी मानले.

नवनिर्वाचित कार्यकारिणी खालीलप्रमाणे- अध्यक्ष - डॉ. समीर चंद्रात्रे, उपाध्यक्ष- डॉ. समीर पेखळे, सचिव- डॉ. प्रितम अहिरराव, सहसचिव- डॉ. पार्थ देवगांवकर, खजिनदार- डॉ. राहुल पाटील, सहखजिनदार- डॉ. अतुल अग्रवाल

## चांदशी नंदनवन हास्य क्लबतर्फे डॉ. आंबेडकर यांना अभिवादन



**नाशिक ।** चांदशी येथील नंदनवन हास्य क्लब तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती शरद मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विजय बिरारी, शंकरराव खरात, प्रियदर्शन टांकसाळे यांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. नंतर घटनेच्या प्रस्तावनेचे वाचन झाले.

सेवानिवृत्त प्राचार्य किशोर देशमुख यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचे एकेक पैलू उलगडून दाखविले. कार्यक्रमास अनिल धटिंगण, अर्चना टांकसाळे, अनुराधा देशपांडे, अलका वामने,दीपक ब्राह्मणकर, कलावती राठोड, कमल उगले, संगीता भामरे, विजय भुसे,विभा भुसे, शांता प्रधान,मंदाकिनी खरात,नीता व्होरा, शोभा महाजन, भिकुबाई नागरे आदी उपस्थित होते.

# रुपेरी पडद्यावर येतोय 'फुले' एका युगप्रवर्तक परिवर्तनाचा प्रवास

**नाशिक ।** 'फुले' हा हिंदी चित्रपट जगभर येत्या २५ एप्रिलला देशभर प्रदर्शित होत आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जातिनिर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनासाठीचे कार्य या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक समतेसाठी लढणाऱ्या या क्रांतिकारी दाम्पत्याच्या प्रेरणादायी जीवनकहाणीला रूपेरी पडद्यावर मांडण्याचा हा प्रयत्न आहे, जो आजच्या पिढीला इतिहासाची जाणीव करून देतानाच नव्या विचारांची दारे उघडणारा ठरणार आहे.

'फुले' चित्रपटाचे निर्माते प्रणय चोक्शी, जगदीश पटेल, रितेश कुडेचा, अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन आणि डॉ. राज खवारे असून, सहनिर्मितीची जबाबदारी क्रांती शानभाग, कलापी नागडा,रोहन गोडांबे, परीधी खंडेलवाल यांनी उचलली आहे. दिग्दर्शक अनंत महादेवन यांनी या चित्रपटाचं प्रभावी दिग्दर्शन केलं आहे. ज्योतिबा फुले यांच्या भूमिकेत 'स्कॅम १९९२' फेम प्रतीक गांधी आणि सावित्रीबाई फुले यांच्या भूमिकेत अभिनेत्री पत्रलेखा झळकणार आहेत. त्यांच्या अभिनयातून या ऐतिहासिक व्यक्तिरेखांना नवी ऊर्जा मिळाल्याचं ट्रेलरवरून स्पष्ट होतं. 'फुले' हा चित्रपट केवळ ऐतिहासिक घटनांचा मागोवा घेत नाही, तर त्यामागची तत्त्वं, मूल्यं आणि सामाजिक चळवळींचं महत्त्व अधोरेखित करतो. त्यामुळे तो केवळ चित्रपट न राहता, एक सांस्कृतिक आणि वैचारिक अनुभव ठरेल. या चित्रपटाच्या दृश्यात्मक आणि तांत्रिक मांडणीला सशक्त आकार



देणाऱ्या क्रिएटिव्ह टीममध्ये अनेक अनुभवी कलाकार सहभागी आहेत. सिनेमॅटोग्राफर म्हणून सुनीता राडिया यांनी प्रभावी चित्रभाषा वापरली आहे. वेशभूषा डिझायनर अपर्णा शाह यांनी ब्रिटिशकालीन भारतातील वास्तव आणि फुल्यांच्या सामाजिक स्तराचे सूक्ष्म दर्शन घडवले आहे. प्रोडक्शन डिझायनर म्हणून संतोष फुटाणे यांनी काळाला साजेशी पार्श्वभूमी उभी केली असून, सिंक साऊंडची जबाबदारी राशी बुट्टे यांनी सांभाळली आहे. संतोष गायके यांनी मेकअप आणि हेअर डिझाइनच्या माध्यमातून पात्रांना अधिक वास्तविक बनवलं आहे. संगीतकार जोडी रोहन-रोहन यांचे पार्श्वसंगीत आणि गीतसंगीत कथानकात भावनात्मक गहिराई निर्माण करतं. रौनक फडणीस यांनी आपल्या संकलनातून कथेला गतिमान ठेवताना प्रसंगांची परिणामकारक मांडणी केली आहे. तर पोस्ट प्रोड्युसर म्हणून कुणाल श्रीकृष्ण तारकर यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. 'फुले' हा केवळ एक चित्रपट नाही, तर एका युगपुरुषाच्या विचारांचा, संघर्षाचा आणि परिवर्तनाच्या प्रवासाचा साक्षीदार ठरणारा दस्तऐवज आहे. २५ एप्रिलपासून हा सिने-अनुभव सर्वांच्या भेटीला येतो आहे.

# आठवांच्या लक्ष हिंदोळ्यावर झुलवणारा-'आठवांचे लक्ष मोती'

एखादे पुस्तक हातात पडते आणि आपण ते लगेचच वरवर चाळतो आणि ठरवतो की, ते केव्हा वाचायचे. लगेचच वाचूयात... असे जरी ठरवले तरी कधी-कधी व्यस्ततेमुळे त्या पुस्तकाची अनेक वेळा आठवण येऊनही ते वाचायचे राहून जाते. पण ते पुस्तक आपल्याला अस्वस्थ मात्र करत राहते. ही अस्वस्थताच एक दिवस त्याला शोधायला भाग पाडते आणि अक्षरशः वाचूनच घेते. कवी आणि प्रख्यात सूत्रसंचालक रवींद्र मालुंजकर यांच्या 'आठवांचे लक्ष मोती'बाबतही असेच झाले. काल-परवा पुन्हा त्याची आठवण झाली. मन अस्वस्थ झाले आणि शेवटी माझी शोधमोहीम सुरू झाली. हे पाहून पत्नी म्हणाली, 'अहो तुमचे काय हरवले. मला तरी सांगा मी शोधून देते!' म्हणालो- 'माझे 'आठवांचे लक्ष मोती' हरवलेत... देतेस का शोधून?' तिचा प्रतिप्रश्न, 'म्हणजे?' आणि तेवढ्यात माझ्या शोध मोहिमेला यश मिळाले! मी तिला हातातले पुस्तक दाखवत म्हणालो 'हेच ते माझे हरवलेले- 'आठवांचे लक्ष मोती!'

'आठवांचे लक्ष मोती'मधील सर्व कविता वाचनीय आहेत. तसेच अष्टाक्षरीवर कवीचे विशेष प्रभुत्व असल्याचे कविता वाचताना जाणकारांना सहज लक्षात येईल. या कवितांमधील प्रत्येक कडवे म्हणजे 'एक आशयगर्भ सुभाषित'च असल्याचे वारंवार वाचकाला जाणवते. कवितेतला शब्दन् शब्द वाचकाच्या काळजाचा ठाव घेणारा हवा असेल तर कवीने आधी इतरांच्या कवितेच्या ओळी काळजात जपल्या पाहिजेत. इतरांच्या ओळी ज्या कवीच्या ओठांवर क्षणोक्षणी धावून येतात; तोच कवी स्वतःच्या शब्दांमध्ये आशयाची ताकद ओतू शकतो. कवी रवींद्र मालुंजकर या नावाचं कविकुळामध्ये एक खास वलय निर्माण झालं आहे. कारण या कवीने प्रत्येकाची कविता हृदयामध्ये केवळ जपलीच नाही तर हजारो रसिक-साहित्यिकांचे कान तृप्त केले आहेत. हा कवी नुसता कविता करणारा, वाचणारा, गाणारा कवी नाही; तर खऱ्या अर्थाने 'कविता जगणारा कवी' आहे. या कवीने लहानांपासून तर नामवंत अशा साहित्यिकांपर्यंत सर्वांच्या कवितांची दिंडी मोठ्या अभिमानाने आपल्या खांद्यावर मिरवली आहे... आणि म्हणूनच या कवीच्या आत-आत, खोल-खोल कविता केवळ झिरपलीच नाही तर मुरली आहे. म्हणतात ना... कोणतीही गोष्ट चांगली मुरल्याशिवाय तिला चांगला स्वाद येत नाही; तशी कवी रवींद्र मालुंजकरांची कविता ही मुरलेली कविता आहे... तिला मातीचा सुगंध आहे, नात्यातला गोडवा आहे, कष्टाची कदर आहे, मायेचा ओलावा आहे, तिला मराठी असल्याचा अभिमान आहे, तिला नम्रता आणि प्रामाणिकपणाची झालर आहे, ती आक्रस्ताळेपणापासून दूर आहे आणि माया, ममतेसोबतच लडिवाळपणाच्याही जवळ आहे. कवी रवींद्र मालुंजकर यांनी आई सरस्वतीकडे शब्दांचा जोगवा मागितला आणि त्यांना उत्तम कवितेचं भरभरून दान मिळालं! कविता त्यांनी लिहिली नाही, कवितेनं स्वतःला त्यांच्याकडून लिहून घेतलं. कवितेने त्यांचे बोट नाही तर आख्खे मनगटच घट्ट पकडले आहे. कवी रवींद्र मालुंजकरांची कविता हे आतलं 'स्फुरण' आहे; म्हणून ती दमदार आणि कसदार आहे. त्यांच्या कवितेत कुठेही बेगडीपणाचा आव नसल्यामुळे तिला स्वतःचा असा खास दर्जा आहे, एक वकूब आहे. त्यांनी त्यांची कविता जरी कागदावर लिहिली असली तरी तिचं अमीट प्रतिबिंब रसिक-वाचकाच्या काळजावर उमटलेलं आहे.

'आठवांचे लक्ष मोती'मध्ये कवीने एकूण अडूसष्ट रचनांमध्ये त्यांचं भावविश्व अतिशय तरलतेने विस्तारलं असून त्यांचे एकूण सहा मनमोहक सुगंधी फुलांच्या गुच्छात रूपांतर केले आहे. पहिल्या गुच्छात सात अष्टाक्षरी कविता आणि एकच मुक्तछंद घेतला आहे. 'काळीजअंगण' असे या गुच्छाला कवीने आत्मीय नाव दिले आहे. ते किती समर्पक आहे; हे त्यातील कविता वाचताना आपल्या परोपरी लक्षात येते. ज्यांच्या मुली सासरी गेल्या आहेत; त्यांचे काळीज या कविता वाचताना तळहातावर येऊन थांबल्याशिवाय राहणार नाही. यातील 'सुख' या कवितेमध्ये ते म्हणतात...

**मुली तुझ्या जन्मामुळे/मिळे बालपण मला**
**साऱ्या विश्वाचेच सुख/झुले आनंदाचा झुला!**
**फक्त नसते मुलगी/कुणी राबणारी बाई**
**एक असते तिच्यात/जीव लावणारी आई!**

त्याचबरोबर 'माझ्या लेकीच्या' या कवितेमध्ये-

**माझ्या लेकीच्या मुखात/कोणी पेरली साखर**
**भूक शमविते माझी/तिच्या हातची भाकर...!**
**लेक सुखाची झालर/रोज नवीन कहाणी**
**तिच्या गोड बोलण्याने/येई डोळ्यांमध्ये पाणी**

'लेक गुणी सोनपरी'मध्ये ते म्हणतात की-

**भल्या पहाटे उठून/सडा-रांगोळी घालते**
**उगवत्या सूर्याकडे/सुख सर्वांचे मागते...!**
**लेक गुणी सोनपरी/दोन्ही घरा उजळते**
**तिच्या सुखाची तुतारी/माझ्या कानात घुमते!**

अशा उत्तमोत्तम आशयघन कविता एकामागून एक येत राहतात आणि वाचकाच्या डोळ्यांमध्ये पाणी तरळवत राहतात. त्यानंतरचा दुसरा गुच्छ म्हणजे 'देणे कवितेचे!' याच्या नावावरूनच कवी कोणत्या शब्दात 'कवितेचे देणे' मांडत असेल; याची सुस्पष्ट कल्पना येते.

**यात 'कविता माझी'मध्ये ते म्हणतात-**
**दुःख जगाचे पाहून/मला सुचते कविता**
**तान्हुल्याच्या हसण्यात/माझी दिसते कविता**
**उमलल्या सुमनात/माझी हसते कविता**





**शिकणाऱ्या मुलांमध्ये/तशी रूजते कविता**
**- तर-**
**देणे कवितेचे/तुम्हा किती सांगू**
**बाळ लागे रांगू/आनंदाने...**
**देणे कवितेचे/आहेच मोहक**
**झालो मी वाहक/विचारांचा...**
**देणे कवितेचे/समृद्धीचे गाणे**
**सोनियाचे नाणे/अस्खलित...**

अशा जवळपास सहा अष्टाक्षरी आणि चार अभंगांच्या रूपात कवी कवितेप्रति कृतज्ञता व्यक्त करताना दिसतो. तसेच...

**येता मातीचा सुगंध/नक्षी रंगली दारात**
**समृद्धीचे काही क्षण/माझ्या सांडले घरात**
**असा मिठ्ठास पाऊस/आला माझ्या अंगणात**
**त्याचा सुखद वर्षाव/हर्ष प्रत्येक मनात...**
**येता सर पावसाची/जग आनंदलं माझं**
**एका क्षणात सरलं/काहिलीचं जड ओझं...**
**पडो सरीवर सरी/मन-देह चिंब व्हावा**
**तुझ्या येण्याचा नगारा/आसमंतात घुमावा...**

अशा बेधुंद करणाऱ्या सरी घेऊन येतो; तो तिसरा आणि अत्यंत महत्त्वाचा सुगंधित गुच्छ 'पाऊस शब्दसरीतला...' हा गुच्छ पहिल्या पावसाचा मातीतून येणारा सुगंध अलवारपणे रसिकांपर्यंत घेऊन येतो. तो सुगंध आतमध्ये खोल-खोल भरून घ्यायला भाग पाडतो. 'पाऊस शब्दसरीतला' यात सात अष्टाक्षरी आणि एक उत्कृष्ट पाऊसगीत समाविष्ट करून रसिकांना कवीने वरीलप्रमाणे चिंब-चिंब केले आहे.

चौथ्या गुच्छामध्ये कवीने एक अष्टाक्षरी, एक अभंग आणि चार मुक्तछंदातील अतिशय लयबद्ध अशा कवितांचा समावेश केला आहे. त्या सर्व आपल्याला कवी शाळेप्रती किती कृतज्ञ आहे; याची जाणीव करून देतात. उदा.-

**आकार जीवनाला/देत असते शाळा**
**अमूल्य संस्कारांचा/ठेवा असते शाळा!**
**महन्मंगल मानव्याचा/झरा असते शाळा**
**प्रेम आणि सद्गुणांचा/दर्वळ असते शाळा...**
**त्यानंतर... 'जीवनाच्या वाटेवर'मध्ये-**
**खूप दिवसांनी भरली/जुन्या आठवांची शाळा**
**काळजाचे जिवलग/झाले भोवताली गोळा!**
**तुम्ही भरला मित्रांनो/रंग आयुष्यात असा**
**किती फेडावे मी ऋण/होऊ उतराई कसा?**
**दुःख पचवून सारे/ठेव मुखावर हसू**
**भरलेल्या गोकुळात/नको दुराव्याचे आसू...**

पाचव्या गुच्छात तर कवीने आपले काळीज रसिकांसमोर खोलून ठेवले आहे. आई-बाबांपासून ते सर्वच नातलग, सर्वच गोतावळ्याचे आपल्या जीवनातील आणि हृदयातील स्थान अधोरेखित केले आहे. आपल्या नातेवाईकांप्रति आपला कृतज्ञ भाव कवीने पुढील शब्दात व्यक्त केला आहे. 'आई'बद्दल कवी म्हणतो-

**आई जपते-जपते/घरभरलं गोकुळ**
**तिच्या राबण्याने मिळे/गोड आनंदाचे फळ**
**आई असते-असते/घरादाराचा आसरा**
**तिच्यामुळे उजळतो/साऱ्या घराचा कोपरा**
**आई अभंग-अभंग/तिची काय सांगू व्यथा**
**असे नशिबी कष्टाची/सदा लिहिलेली गाथा**
**तसेच-**
**आई भक्तीचा सागर/जणू विठ्ठल माउली**
**तिच्या कृपाप्रसादाची/नाही लोपली सावली**
**आई शिकवी लेकाला/जगण्याचा सत्य धडा**
**त्याच्या मार्गावर पडो/सदा प्राजक्ताचा सडा**

अशा अनेक आशयगर्भ कवितांमधून कवी आईबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. तर-

**दादा राबले-राबले/झाले जरी लाख कष्ट**
**किती सोसल्या वेदना/कधी बोलले ना स्पष्ट**
**दिला सर्वांना आधार/झाले घराचाही कणा**
**कधी रागावले नाही/दुखावले नाही कुणा...**

अशा पद्धतीने वडिलांबद्दल; तर बहिणीबद्दल-

**माझ्या बहिणीची माया/जशी काळीज फुंकर**
**जागविला तिने माझ्या/जीवनाचा प्रेमांकुर...**
**बहीणच झाली सखी/होई तीच आता माय**
**माता नसे ज्या लेकरा/हवे त्याला दुजे काय?**

'संस्कारगीते...'मध्ये कवी म्हणतात की-

**माझ्या माणसांची/काय सांगू कीर्ती**
**काळजात मूर्ती/सदा त्यांची...**
**त्यांच्यामुळे घेई/गगनी भरारी**
**दुःखात उभारी/देती तेच...**
**सारे गणगोत/हक्काचे सोबती**
**जगण्याची नीती/शिकवती...**

यामध्ये सात अष्टाक्षरी, पाच मुक्त आणि दोन सुंदर अभंगांचा समावेश आहे. सहाव्या आणि शेवटच्या गुच्छाला 'विविधा' असे नाव देऊन कवीने सर्व सामाजिक जाणिवांना न्याय देत दीपावलीपासून तर निसर्गापर्यंत सर्वच घटकांना आपल्या शब्दरूपी कवेत सामावून घेतले आहे. सहा तुकड्यांमधील एक अल्पाक्षरी कवितादेखील खूपच भाव खाऊन जाते; हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

अशा उत्तमोत्तम काव्यगुच्छांतून कवी येथे मनमुराद व्यक्त होतो आहे. यातील एकाही कवितेने उसने अवसान आणलेलं कुठेही दिसत नाही. सर्वच कविता या अस्सल आहेत. वाचक-रसिकांनी प्रेरणा घ्यावी आणि आयुष्य रडत-पडत नाही तर सकारात्मकतेने जगावे, जीवनाकडे आत्मीय भाव ठेवून बघावे आणि आपले जगणे सुंदर करून घ्यावे... अशी ही कविता संदेश देत आहे. ज्यांना मुलगी आहे त्यांनी आणि ज्यांना नाही... अशा सर्वांनीच या कविता आवर्जून वाचाव्यात; इतक्या दर्जेदार झाल्या आहेत. हे पुस्तक अभ्यासकांनी, व्याख्यात्यांनी, सूत्रसंचालकांनी संग्रही ठेवावे; असे मला मनापासून वाटते. वैशाली प्रकाशन, पुणे यांची ही एक अप्रतिम कलाकृती असून नेहमीप्रमाणे चित्रकार अरविंद शेलार यांचे समर्पक मुखपृष्ठ आणि रेखाटनांनी संग्रह देखणा केला आहे. या संग्रहाची पाठराखण आमचे मार्गदर्शक कविवर्य विवेक उगलमुगले यांनी अतिशय भक्कमपणे केली असून कवी रवींद्र मालुंजकर यांची आनंद व सदभाव पेरणारी... साधे-सोपे प्रतीकं-प्रतिमा लेऊन आलेली ही भावकविता आहे. नैराश्यात उत्साह निर्माण करणारी अशी ही सुंदर कविता आपल्या सर्वांना नक्की वाचायला आवडेल.

पुरस्कारांना पुस्तके पाठवणे... हा कवीचा स्वभाव नाही. तरीही या काव्यसंग्रहाला दिंडोरी तालुका सांस्कृतिक मंच यांचा 'उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार' तसेच गिरणा गौरव प्रतिष्ठानचा 'सिनेअभिनेत्री स्मिता पाटील स्मृती शब्दपेरा काव्यसंग्रह' पुरस्कार या महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. तसेही वाचकांचे, अभ्यासकांचे अभिप्राय तर एवढे असावेत की, त्यांचेच स्वतंत्र पुस्तक व्हावे. असो पुढील काळात सरांचे असेच आशयसमृद्ध काव्यसंग्रह येवोत आणि आपल्याला वाचायला मिळोत; ही सदिच्छा व्यक्त करतो, शुभेच्छा देतो आणि थांबतो.

**- काशीनाथ गवळी, नांदगाव (नाशिक).**
**मो.९८५०४४१२८७**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे गुलामगिरीच्या श्रृंखला तोडणारा महायोध्दा : प्रा. प्रभाकर पिंगळे



**शिलाँग ।** मानवी हक्कांचे कैवारी, जागतिक दर्जाचे भारतीय अर्थशास्त्रज्ञ, कायदेपंडित, राजनीतिज्ञ, लेखक, समाज सुधारक, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे जनक, दीन दलितांच्या जीवनाला जखडलेल्या गुलामगिरीच्या शृंखला तोडगारा महायोध्दा म्हणून भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि देशातील महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जगाला घ्यावेच लागेल, असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र विषयाचे अभ्यासक व विचारवंत प्रा. प्रभाकर पिंगळे यांनी व्यक्त केले.

मेघालय राज्यातील शिलाँग जवळील जंगलात झालेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्ल्ड टूर कंपनीच्या मुख्य सीईओ ममता सरवदे-केदारे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रेल्वेतील सेवानिवृत्त अधिकारी भास्करराव साबळे, पुणे येथील वरिष्ठ ग्रंथपाल जयश्री जगताप, नाशिकच्या महाविद्यालयातील सेवानिवृत्त संशोधक प्रा. डॉ. सोपान एरंडे, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक शरद काठे, पोल्ट्री व्यावसायिक रश्मिन उर्फ दादा माळी आदी यावेळी उपस्थित होते. प्रा. पिंगळे पुढे म्हणाले की, डॉ. आंबेडकर उपेक्षितांच्या जीवनामध्ये अस्मितेची ज्योत पेटवणारे प्रकाशसूर्य होते. स्वतःच्या अलौकिक विद्वत्तेचा वापर समाजहितासाठी करणारे, अस्पृश्यता मिटवण्यासाठी चंदनापरिस आपला जीव झिजवणारे, आपल्या बांधवांच्या उन्नतीसाठी अहोरात्र झटणारे, समतेसाठी सत्याग्रह करणारे भारताचे ते एक अमूल्य रत्न ठरले. शालेय शिक्षण घेताना 'अस्पृश्य' म्हणून त्यांन मानहानी स्विकारावी लागली होती. पण ते मुळीच खचले नाहीत, त्यांनी अस्पृश्यांसाठी दीन दलितांचा उध्दार करणे हे जीवनाचे अंतिम ध्येय ठेवले होते. अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या महामानव, ज्ञानसवांदी तपस्वी, अमोध वक्तृत्वाचा व कुशल नेतृत्वाचा धनी म्हणून समाज त्यांना ओळखतो. जरी ते आपल्यात नसले तरी त्यांचे विचार लाखो लोकांना स्फूर्ती, चैतन्य देत आहेत, असेही प्रा. पिंगळे म्हणाले.

यावेळी नाशिक येथील श्रीराम मित्रमंडळ शिक्षण संस्थेतील शिक्षिका आशा देशमुख, सातपूर हायस्कूलच्या सेवानिवृत्त शिक्षिका रत्नमाला बागूल, सुचिता एरंडे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमास सेवानिवृत्त लेखाधिकारी पी. डी. जाधव, सुवर्णा जाधव, वित्त अधिकारी राजू ढगे, मनीषा ढगे, अंजली माळी, लता माळी, आदिवासी विभागातील सेवानिवृत्त अधिकारी भाऊसाहेब तुंगार, मीरा तुंगार, प्रमिला साबळे,, उद्योजक अण्णासाहेब देशमुख, संगिता देशमुख, केबल व्यावसायिक शिवा देशमुख, प्रगतिशील शेतकरी माणिकराव काठे, सविता काठे, रेखा काठे, रविकांत सावंत, लता सावंत, दैनिक 'महासागर'चे नाशिक आवृत्तीचे संपादक प्रा. जयंत महाजन, सीमा महाजन आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. विष्णू बागूल यांनी केले. संजीवनी पिंगळे यांनी आभार मानले.

## महिलांचा उत्स्फूर्त सहभाग ठरला भारावणारा

पुणे येथील पर्यटक जयश्री जगताप म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला "शिका संघटित व्हा व संघर्ष करा" हा मंत्र दिला. आजच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता संपूर्ण समाजाने विशेष करून तरुणांनी हा विचार अंगिकारून समाजाच्या उद्धारासाठी त्याचा उपयोग करावा. डॉ. आंबेडकर यांनी स्त्री शिक्षणाबरोबर समाजामध्ये वागताना धर्माचा विचार न करता शिक्षणाचा विचार करून समाजाची, देशाची व स्त्रियांची प्रगती करण्यासाठी सर्वांनी त्याचा उपयोग करावा. त्याचप्रमाणे बाबासाहेबांचे गुरु महात्मा फुले यांची प्रखर विचारसरणी अनुसरून स्त्री शिक्षणाला विशेष महत्त्व देऊन स्त्रियांनी आत्मनिर्भर झाले पाहिजे असा संदेश दिला. यावेळी शिक्षिका रत्नमाला बागूल यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर कविता सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. यावेळी शेकडो पर्यटक आपली वाहने थांबवून डॉ. आंबेडकरांना मानवंदना देत होते. पर्यटकांनीच पुढाकार घेतलेला हा कार्यक्रम चर्चेचा विषय ठरला.

## महाराष्ट्राच्या पर्यटकांचे जोरदार स्वागत

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून चीनच्या सीमारेषेपासून अरुणाचल आसाम व मेघालय असा अभ्यास दौरा करणाऱ्या पर्यटकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्याचा निर्णय या दौ-यात घेतला होता. भारतीय समाजातील दलीत, शोषित, वंचित आणि महिलांना त्यांचे हक्क मिळवून देणारा संविधान निर्माता, हजारो पिढ्यांपासूनचे सामाजिक शोषण एका पिढीत संपवणारा क्रांतिकारक, सच्चा देशभक्त, प्रज्ञावंत, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांना नमन करण्यासाठी सर्व मराठी माणसं काल मेघालयातील शिलाँगमध्ये एकत्र आले होते. त्यात नाशिकमधील संख्या लक्षणीय होती. यावेळी प्रा. डॉ. सोपान एरंडे म्हणाले की, बाबासाहेब नेहमी म्हणायचे की, नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा. आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे, ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका. आज जंगलातून प्रवेश करतांनाही पर्यटक या नात्याने बाबासाहेबांची आठवण ठेवली ही अत्यंत समाधानाची बाब आहे. डॉ. आंबेडकरांची जयंती प्रतिकूल परिस्थितीत साजरी करतांना पाहून शेकडो पर्यटक नतमस्तक झाले. सर्वांनी महाराष्ट्राच्या पर्यटकांचे कौतुक केले.

# शहर वाहतूक बसमधील इमर्जन्सी बटन विनाकारण दाबल्यास दंडात्मक कारवाई

## सिटीलिंक प्रशासनाचा प्रवाशांना इशारा



**नाशिक ।** शहर वाहतूक बसेसमधून प्रवास करताना प्रवाशांनी अडचणीच्या वेळेसाठी असलेले इमर्जन्सी बटन विनाकारण दाबल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा सिटीलिंक प्रशासनाने दिला आहे.

महापालिकेच्या सिटीलिंक बसेसमधून दररोज लाखो नागरिक प्रवास करतात. या प्रवाशांच्या सोयीसाठीच सिटीलिंकने शहर वाहतूक बसेसमध्ये प्रवास करतेवेळी काही गंभीर अडचण आल्यास मदत मिळविण्यासाठी बस तात्काळ थांबविण्यासाठी बसमध्ये इमर्जन्सी बटनची सुविधा दिलेली आहे. हे बटन दाबल्यास बस तात्काळ थांबते; परंतु त्यानंतर बस पूर्ववत सुरू करण्यासाठी बसचालक आणि वाहकाला तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना त्रास सोसावा लागतो. अलीकडे कारण नसताना उगाचच इमर्जन्सी बटन दाबण्याचे प्रकार प्रवाशांकडून घडत असल्याचे लक्षात आल्याने याबाबत सिटीलिंक प्रशासनाने कडक धोरण स्वीकारत विनाकारण इमर्जन्सी बटन दाबणाऱ्या प्रवाशार दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांनी खूपच गरज, अडचण असेल तरच इमर्जन्सी बटनाचा उपयोग करावा, असे आवाहनही केले आहे.

# डॉ. आंबेडकर जयंती स्वामी विवेकानंद विद्यालयात उत्साहात





**नाशिक ।** महान विचारवंत, संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस मुख्याध्यापक किशोर झोटिंग यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यानंतर उपशिक्षक ललित शार्दुल यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत उपस्थितांना त्यांच्या संघर्षमय जीवनाची प्रेरणादायी माहिती दिली.तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक निता पाटील यांनी केले. याप्रसंगी पर्यवेक्षिका शुभदा टकले, सर्व सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पांडवलेणी खून प्रकरणी तीन आरोपींसह एक विधीसंघर्षित बालक सहा तासांत जेरबंद

**नाशिक ।** दि. १३ एप्रिल रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास पांडवलेणीजवळ ज्ञानपीठ सोसायटीसमोर रामा बोराडे याचा धारदार शस्त्राने खून करण्यात आला होता. कबुतराच्या वादातून झालेल्या या गंभीर घटनेने परिसरात खळबळ उडाली होती. या प्रकरणी इंदिरानगर पोलिसठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या निर्देशानुसार व पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव व सहा. पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट क्र.१ चे पथक तयार करण्यात आले. पथकाने केवळ ६ तासांत शौकत शेख, नफीज सैय्यद, कार्तिक भडांगे आणि एका विधीसंघर्षित बालकाला समर्थनगर, पाथर्डी फाटा परिसरातून अटक केली. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांना पुढील तपासासाठी इंदिरानगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या नेतृत्वाखाली सपोनि हिरामण भोये, पोउनि रविंद्र बागुल, पोहवा विशाल काठे, तसेच गुन्हे शाखेच्या इतर कर्मचाऱ्यांनी केली. पोलीस दलाच्या वेगवान आणि प्रभावी कारवाईमुळे नागरिकांतून समाधान व्यक्त होत आहे.

## नागरी वापरातील रस्त्याची दुरवस्था; मनपाचे दुर्लक्ष

**नाशिक ।** शरणपूर रोडवरील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयाच्या बाजूने असलेल्या कच्च्या रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली असून, वापराअभावी रस्त्याला कचराकुंडीचे स्वरूप आले आहे. महापालिकेच्या संबंधित विभागाने नागरिकांच्या दृष्टीने सोयीच्या असलेल्या या रस्त्याची डागडुजी, देखभाल दुरुस्ती केली तर नागरिकांची चांगली सोय होऊ शकेल.

### स्वच्छतेसह रस्त्याच्या डागडुजीची गरज

सीबीएसपासून शरणपूर रोडने जाताना डावीकडे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय आहे. या कार्यालयाच्या बाजूनेच एक कॉलनी कच्चा रस्ता जातो. या रस्त्याने पोलीस वसाहतीसह इतर कॉलनी नागरी वसहतीकडे जाता येते. पुढे जाऊन हा रस्ता रामायण बंगल्यासमोरील रस्त्याला मिळतो. नागरिकांना शॉर्ट कटने जाण्यासाठी हा रस्ता महत्वाचा आहे; परंतु रस्त्याला कचराकुंडीचे स्वरूप आले आहे. गटारींचे पाणी रस्त्यावरून वाहते आहे. शिवाय रस्ता कच्चा असल्याने रस्त्याची अतिशय दुरवस्था झाली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागालाही यामुळे त्रास सोसावा लागतो. या रस्त्याची स्वच्छता करण्याबरोबरच डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.


## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

### तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक.

यांचे कार्यालय, दुसरा मजला, सिन्नर व्यापारी सहकारी बँक मर्या., (अवसायनात), सिन्नर, जि. नाशिक. Email : arofficesinnar@gmail.com

खालील संस्थांच्या संचालक मंडळ, पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रमास मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिलेली असून, सदर संस्थांचा निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व पदनाम | मतदार संघाचे नाव | निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध दिनांक | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठीचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशन पत्रे) | नामनिर्देशन पत्रांच्या यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचा दिनांक | वैध नामनिर्देशन पत्रांची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणीचा दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. |
| १. | **समृध्दी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक.** | **श्री. संजय गिते,** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर | सहकार कायद्यातील तरतूद व संस्थेच्या उपविधीनुसार संचालक मंडळाची रचना राहील. | १५/०४/२५ निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात | १६/०४/२५ ते २२/०४/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | २२/०४/२५ दु. ४.३० वा. (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २३/०४/२५ स. ११.०० वाजता (निवडणूक कार्यालय) | २५/४/२५ (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २५/०४/२५ ते ०९/०५/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | १३/०५/२०२५ स. ११.०० वा. (निवडणूक कार्यालयात) | १९/०५/२५ स. ८.०० ते दु.४.०० वाजेपर्यंत (स्थळ नि.नि.अ. नंतर जाहीर करतील.) | १९/०५/२५ दु.४.३० वाजेपासून (स्थळ- निवडणूक निर्णय अधिकारी नंतर जाहीर करतील.) | मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेच. |
| २. | **साई आनंद महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., भरतपूर, ता. सिन्नर, जि. नाशिक.** | **श्री. किशोर भालेराव,** सहकार अधिकारी, श्रेणी-१, सिन्नर | सहकार कायद्यातील तरतूद व संस्थेच्या उपविधीनुसार संचालक मंडळाची रचना राहील. | १५/०४/२५ निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात | १६/०४/२५ ते २२/०४/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | २२/०४/२५ दु. ४.३० वा. (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २३/०४/२५ स. ११.०० वाजता (निवडणूक कार्यालय) | २५/४/२५ (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २५/०४/२५ ते ०९/०५/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | १३/०५/२०२५ स. ११.०० वा. (निवडणूक कार्यालयात) | १९/०५/२५ स. ८.०० ते दु.४.०० वाजेपर्यंत (स्थळ नि.नि.अ. नंतर जाहीर करतील.) | १९/०५/२५ दु.४.३० वाजेपासून (स्थळ- निवडणूक निर्णय अधिकारी नंतर जाहीर करतील.) | मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेच. |
| ३. | **अमृत महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक.** | **श्री. सुदर्शन तांदळे,** सहकार अधिकारी, श्रेणी-२, सिन्नर | सहकार कायद्यातील तरतूद व संस्थेच्या उपविधीनुसार संचालक मंडळाची रचना राहील. | १५/०४/२५ निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात | १६/०४/२५ ते २२/०४/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | २२/०४/२५ दु. ४.३० वा. (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २३/०४/२५ स. ११.०० वाजता (निवडणूक कार्यालय) | २५/४/२५ (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २५/०४/२५ ते ०९/०५/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | १३/०५/२०२५ स. ११.०० वा. (निवडणूक कार्यालयात) | १९/०५/२५ स. ८.०० ते दु.४.०० वाजेपर्यंत (स्थळ नि.नि.अ. नंतर जाहीर करतील.) | १९/०५/२५ दु.४.३० वाजेपासून (स्थळ- निवडणूक निर्णय अधिकारी नंतर जाहीर करतील.) | मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेच. |
| ४. | **माधवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., पांगरी, ता. सिन्नर, जि. नाशिक.** | **श्री. गडाख नवनाथ,** सहाय्यक सहकार अधिकारी, सिन्नर | सहकार कायद्यातील तरतूद व संस्थेच्या उपविधीनुसार संचालक मंडळाची रचना राहील. | १५/०४/२५ निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात | १६/०४/२५ ते २२/०४/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | २२/०४/२५ दु. ४.३० वा. (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २३/०४/२५ स. ११.०० वाजता (निवडणूक कार्यालय) | २५/४/२५ (निवडणूक कार्यालय व संस्थेच्या कार्यालयात) | २५/०४/२५ ते ०९/०५/२५ स. ११.०० ते दु.३.०० वाजेपर्यंत (निवडणूक कार्यालयात) | १३/०५/२०२५ स. ११.०० वा. (निवडणूक कार्यालयात) | १९/०५/२५ स. ८.०० ते दु.४.०० वाजेपर्यंत (स्थळ नि.नि.अ. नंतर जाहीर करतील.) | १९/०५/२५ दु.४.३० वाजेपासून (स्थळ- निवडणूक निर्णय अधिकारी नंतर जाहीर करतील.) | मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेच. |

● **टीप**- (१) स्तंभ क्र. ०८ ते १० मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी संबंधित संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. (२) मतदार यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये विकत मिळू शकतील. (३) नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हांच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहे. (४) नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर त्याची त्याची प्रसिध्द, मतदान व मतमोजणीचे दिवस वगळून इतर निवडणूक कार्यक्रम शासकीय/ सार्वजनिक सुट्यांखेरीज सुरू राहील. (५) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय हे संबंधित तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, यांचे कार्यालयात राहील. (६) मतदान व मतमोजणीचे ठिकाण निवडणूक निर्णय अधिकारी नंतर प्रसिध्द करतील.

स्थळ- सिन्नर
दिनांक- १४/०४/२०२५

सील

सही/- (संजय गिते)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिन्नर, जि. नाशिक.

# काँग्रेसचे दिवास्वप्न...

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ८४ वे अधिवेशन गुजरातमधील अहमदाबाद येथे ८ आणि ९ एप्रिलला पार पडले. गेली दहा-अकरा वर्षे पराभवाच्या गर्तेत सापडलेल्या काँग्रेसला संजीवनी कशी मिळणार यावर अधिवेशनात चर्चा झाली. मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी आणि अन्य बड्या नेत्यांची भाषणे झाली.

या अधिवेशनाने काय दिले याचा शोध घेतला तर ठोस असे काही सांगता येत नाही. सलग तिसऱ्यांदा लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला पराभव पत्करावा लागला आहे. ज्या राज्यात काँग्रेसचे अ. भा. अधिवेशन झाले, त्या गुजरातमध्ये गेली तीस वर्षे काँग्रेस सत्तेबाहेर आहे.

तब्बल ६४ वर्षांच्या कालावधीनंतर गुजरातमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन झाले हेच विशेष म्हणावे लागेल. आगामी गुजरात विधानसभा निवडणुकीत सत्तेवर येण्याची स्वप्ने पाहणाऱ्या काँग्रेसला, सध्याच्या विधानसभेत १८२ पैकी १५६ आमदार भाजपाचे आहेत, याचा विसर पडला असावा.

सन १९६० मध्ये गुजरात राज्याची निर्मिती झाल्यावर १९६१ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भावनगरमध्ये झाले होते. तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, उच्छंगराय ढेबर यांच्या उपस्थितीत ते पार पडले.

१९६१ मध्ये झालेल्या काँग्रेसच्या ६६ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष नीलम संजीव रेड्डी होते. स्वागताध्यक्ष ठाकोरभाई देसाई होते. सरचिटणीस जी. राजगोपालन, सादिक अली व कोषाध्यक्ष महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण उपस्थित होते.

भावनगर येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन व्हावे यासाठी बलवंतराय मेहता हे स्वतः आग्रही होते. तेव्हा पंडित नेहरूंची लोकप्रियता उत्तुंग होती. चाचा नेहरूंना पाहण्यासाठी हजारो लोक भावनगरला आले होते. भावनगरच्या अधिवेशनात काँग्रेसने राष्ट्रीय एकात्मता समिती स्थापन केल्याचे जाहीर केले व समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी इंदिरा गांधींकडे सोपविण्यात आली.

तेव्हा नीलम संजीव रेड्डी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते, काँग्रेस पक्षात शिस्त राखली पाहिजे. पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये ध्येयाची भावना जोपासली पाहिजे. पुढील वर्षी (१९६२) निवडणुका होतील, आपण का उभे आहोत, आपण निवडणुका कशासाठी लढवत आहोत, हे लोकांना सहजपणे समजवता आले पाहिजे.

जे ६४ वर्षांपूर्वी अध्यक्षपदावरून भाषण करताना नीलम संजीव रेड्डी यांनी सांगितले, तेच बोल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना अहमदाबादमधील अधिवेशनात सांगण्याची पाळी आली. स्वातंत्र्यांपासून देशाची व बहुतेक सर्व राज्यांची सत्ता वर्षानुवर्षे काँग्रेस पक्षाकडेच होती. काँग्रेसला आव्हान देईल असा राष्ट्रीय पातळीवर खंबीर व भक्कम पर्याय या काळात उभा राहू शकला नाही.

नरेंद्र मोदींचा राष्ट्रीय क्षितीजावर उदय झाल्यापासून म्हणजे सन २०१३ पासून काँग्रेसची घसरण सुरू झाली. गेले तीन टर्म काँग्रेस केंद्रात सत्तेवर नाही. त्यातली दोन टर्म म्हणजे २०१४ ते २०२४ काँग्रेसला लोकसभेत पुरेसे संख्याबळ नसल्याने विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आले नाही.

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे १०० खासदार निवडून आल्याने दहा वर्षांच्या पोकळीनंतर काँग्रेसच्या वाट्याला विरोधी पक्ष नेतेपद आले. लोकसभा व राज्यसभा या संसदेतील दोन्ही सदनातील विरोधी पक्ष नेतेपद काँग्रेसकडे आहे. तरीही काँग्रेसला निवडणुकीच्या राजकारणात पाठोपाठ अपयश का येत आहे?

अहमदाबादच्या काँग्रेस अधिवेशनात व्यासपीठावर मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी असे हायकमांड उपस्थित असताना त्यांच्यासमोर देशातील काही पदाधिकाऱ्यांनी विशेषतः महिलांनी सडेतोड भूमिका मांडून पक्षाला वारंवार येत असलेल्या अपयशाला पक्षाचेच काही नेते जबाबदार असल्याचे ठणकावून सांगितले.

राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर व मणिपूर ते मुंबई अशा दोन पदयात्रा काढून सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्याबरोबर हजारो लोक चालत होते. त्यांचे सर्वत्र जोरदार स्वागत होताना दिसले.

मग काँग्रेसला लोकसभा, विधानसभा निवडणुकांमध्ये यश का लाभले नाही? पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व पक्षासाठी मेहनत घेतात, निवडणूक काळात अहोरात्र प्रयत्न करतात पण पक्षातील काही गद्दार पक्षाचा पराभव कसा होईल असे वागतात असेही आरोप अधिवेशनात केले गेले.

राहुल गांधी हेच काँग्रेस कार्यकर्त्यांना एकमेव आशास्थान वाटते. ते पक्षात कार्यरत किंवा सक्रिय असतात तेव्हा पक्षात थोडी जान येते पण मधेच ते गायब होतात, कुठे तरी सुट्टीवर किंवा विदेशात निघून जातात, मग भरंवसा कोणावर ठेवायचा? असा प्रश्न कार्यकर्ते विचारतात.

कार्यकर्त्यांना ऊर्जा देईल, राज्या-राज्यात कार्यकर्ते सक्रिय राहतील असे देशपातळीवर व राज्य पातळीवर नेतृत्व काँग्रेसकडे नाही. तरुणाईला काँग्रेसकडे आकर्षित करील असा पक्षाकडे नेता नाही. मग पक्ष कसा वाढणार?

काँग्रेस जिल्हाध्यक्षांचा एक मुलगा भाजपामध्ये व दुसरा प्रादेशिक पक्षात असेल तर त्या जिल्हाध्यक्षांवर विश्वास कोण ठेवणार? प्रदेशाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष किंवा शहराध्यक्षांनी निवडणूक लढवता कामा नये, असा दंडक पक्षाने घातला पाहिजे.

शा पदांवर बसलेले नेते पक्षाची उमेदवारी मिळवतात व स्वतः लढतात, त्यामुळे पक्षाच्या अन्य उमेदवारांच्या प्रचाराकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ मिळत नाही. प्रदेशाध्यक्ष किंवा जिल्हा अध्यक्ष स्वतःच्या मतदारसंघात अडकून बसले तर पक्षाचे अन्य उमेदवार कसे निवडून येतील? त्यांना निवडणुकीची रसद कोण पुरवील?

अहमदाबाद येथे झालेल्या अधिवेशनात राहुल गांधी यांचे जे भाषण झाले त्यात तेच तेच मुद्दे होते. संसदेत झालेल्या वक्फ विधेयकावरील चर्चेत त्यांनी भागच घेतला नाही. जर संवेदनशील विषयावर विरोधी पक्ष नेताच बोलणार नसेल तर विरोधी बाकांवरील सदस्यांमध्ये काय संदेश जाणार? या विषयावर चर्चा होत असताना प्रियंका गांधी वड्रा या संसदेत फिरकल्याही नाहीत मग पक्षाने काय बोध घ्यायचा?

काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात लोकसभा, तसेच दिल्ली, महाराष्ट्र, हरियाणा विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे आत्मचिंतन होईल असे वाटले होते, पण तसे घडले नाही.

आपण कुठे नेमके कमी पडतोय हे कुणी सांगितले नाही. राहुल गांधींचे भाषण म्हणजे तेच तेच सांगत असतात. त्यांच्या प्रत्येक भाषणात राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर टीका असते. भाजपा व संघाला केवळ काँग्रेसच रोखू शकते असे ते सांगतात मग गेली अकरा वर्षे प्रत्येक निवडणुकीत काँग्रेस पक्ष सपाटून मार का खात आहे?

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी, तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन, उत्तर प्रदेशात अखिलेश यादव, जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांनी भाजपापुढे आव्हान उभे केले तसे काँग्रेसला कोणत्या राज्यात भाजपाला नमवता आले? आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू व बिहारमध्ये नितीश कुमार यांना बरोबर घेणे भाजपाला भाग पडते पण त्या राज्यातही काँग्रेसला तिसऱ्या-चौथ्या क्रमांकावर आहे.

बांगला देशाचे राष्ट्रपती उलट उत्तर देतात आणि त्यांच्यासोबत बसलेले मोदीजी गप्प बसतात, अशी बालिश टीका करणे मुळात औचित्याला धरून नाही. आपले पंतप्रधान थेट झुकतात असे बोलणे, राहुल यांना शोभले नाही.

रामलीला मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने राज्य घटना जाळली किंवा महाराष्ट्र विधानसभा निवडणूक म्हणजे मोठा घोटाळा, असे आरोप राहुल करतात पण त्याला देशात कुठेच प्रतिसाद मिळत नाही, मग वारंवार तेच तेच बोलून काय साध्य करतात? भाजपा, संघ व सावरकर हे राहुल यांचे टीका करण्याचे आवडीचे विषय आहेत पण त्याचा लाभ पक्षाला निवडणुकीत मिळत नाही.

वारंवार येणाऱ्या अपयशाने मल्लिकार्जुन खरगे अस्वस्थ आहेत. पराजयाची मालिका संपत नाही आणि कोंडी फुटत नाही. भाजपासारखे निवडणूक व्यवस्थापन, कार्यकर्त्यांची संघटित फौज, संघाची निष्ठावान केडर आणि मोदी- शहांसारखे दणकट नेतृत्व काँग्रेसकडे नाही.

काँग्रेस पक्ष कमकुवत व्हावा म्हणून पक्षाचे ताकदवान नेते भाजपा खेचून घेत आहे, असे म्हणणे म्हणजे आपले पक्षावर नियंत्रण राहिलेले नाही, हे मान्य करण्यासारखे आहे. ज्यांना काम करायचे नाही त्यांनी घरी बसावे असा इशारा खरगे यांनी अधिवेशनात दिला आहे.

निवडणूक काळात भाजपाप्रमाणे मतदार यादीसाठी पन्ना प्रमुख नेमण्याचे काँग्रेस योजत आहे. यापुढे एक कुटुंब एकच उमेदवारी मिळेल. पाच वर्षांपेक्षा जास्त काळ पद मिळणार नाही, ५० टक्के पदे ५० वर्षांखालील वयाच्या कार्यकर्त्यांना मिळतील असे खरगे यांनी जाहीर केले. काँग्रेस कमकुवक राहावी हीच भाजपाची रणनिती आहे असे खरगे सांगतात. मग काँग्रेस शक्तिशाली यासाठी भाजपाचे काम करावे असे त्यांना वाटते काय?

पोलादी पुरुष म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरदार वल्लभभाई पटेल यांचा मोदींनी गुजरातमध्ये उत्तुंग पुतळा उभारून सात वर्षे झाली, आज काँग्रेसला वल्लभभाई पटेल हे आमचे नेते आहेत, असे सांगण्याची पाळी आली. कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेश या तीनच राज्यांत काँग्रेसचे सरकार आहे. पण मोदी-शहांच्या गुजरातमध्ये सत्तेवर येण्याचे स्वप्न पाहणे म्हणजे काँग्रेसचे दिवास्वप्न आहे.

■ ■ ■

# आधुनिक भारताचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील, दलित बौद्ध चळवळीचे प्रेरणास्थान आणि भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची काल संपूर्ण विश्वात जयंती साजरी झाली.

प्रचंड बुद्धिमत्ता, समाजासाठी असीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे, महाडचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन, मंदिर सत्याग्रह, शेतक?्यांचा कैवारी, गोलमेज परिषद, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षण संस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, महिलांसाठी कार्य, स्वातंत्र्य लढ्यात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या.

समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा प्रामुख्याने विचार केला. शिक्षणासाठी, समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा गुरुमंत्र दिला. असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला जोड नाही.

## प्रारंभीचा काळ

मध्य प्रदेशातील महू येथे बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. बाबासाहेबांच्या वडिलांचे नाव रामजी आणि आईचे नाव भीमाबाई असे होते. मध्य प्रदेशानंतर काही काळ दापोली, सातारा असे वास्तव्य करीत आंबेडकरांचे कुटुंब मुंबईत राहण्यास आले. बाबासाहेबांनी सुरुवातीचे शिक्षण मुंबईतील सरकारी शाळेत घेतले. बाबासाहेबांनी शिक्षण घेण्यासाठी खूप कष्ट सोसले. वयाच्या १४-१५ वर्षी बाबासाहेब आंबेडकर यांचा विवाह दापोली येथील भिकू वलंगकर यांच्या मुलीशी म्हणजेच रमाबाई यांच्याशी झाला. बाबासाहेब आपल्या शालेय जीवनात १८ तास अभ्यास करत असत.

## उच्च शिक्षण

मॅट्रिकची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्यानंतर बाबासाहेबांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. ची पदवी घेतली. बडोदा संस्थानाचे सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. कोलंबिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयाद एम.ए.ची पदवी संपादन केली. त्यानंतर याच विषयात डॉक्टरेट मिळवली.

परदेशातील विद्यापीठातून अर्थशास्त्रात पदवी संपादन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पहिले भारतीय होते. बाबासाहेबांनी दोन विषयात एम.ए. केले. दोन विषयात पीएच.डी. मिळवली. बार-अॅट-लॉ आणि डी. एससी पदवी घेतली. ग्रेज इन येथून बॅरिस्टर-अॅट-लॉ ही पदवी घेऊन ३ एप्रिल १९२३ रोजी मुंबईत परतले.

समाजकार्य करावे व अर्थाजनासाठी वकिली करावी असा निर्णय त्यांनी घेतला. सुरुवातीच्या काळात बाबासाहेबांनी उत्तम प्रकारे वकिली केली.

## सत्याग्रह

१९२० मध्ये बाबासाहेबांनी मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले. संपूर्ण देशात बहुसंख्य ठिकाणी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा किंवा पिण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळेच अस्पृश्यांना त्यांचा हक्क मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी महाड येथे पिण्याच्या पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले.

बाबासाहेब आंबेडकरांनी २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथे 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, हे ह्या सभेचे ध्येय होते. हिंदू असूनही हिंदूच्या मंदिरात प्रवेश मिळत नसल्यामुळे तो समानतेचा अधिकार मिळवण्यासाठी अमरावती येथील प्राचीन अंबाबाई मंदिरात, पुण्यातील पर्वती मंदिरात, नाशिक येथील काळाराम मंदिरात बाबासाहेबांनी मंदिर सत्याग्रह केला.

## शेतकऱ्यांसाठी कार्य

शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले म्हणजे ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील. आर्थिक विषमता जितकी कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असे बाबासाहेबांना वाटत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांत महत्त्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत, असे त्यांचे स्पष्ट मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काही संकल्पनातूनच कमाल जमीनधारणा कायदा, सावकारी व खोती पद्धतींना प्रतिबंध करणारा कायदा, सामूहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना अमलात आल्या. शासनाने त्याबाबत कायदे व नियम बनविले. यामागे डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांचाच प्रभाव दिसून येतो.

## असामान्य कर्तृत्व

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्र पीडित, शोषित व दलितांचे प्रतिनिधी म्हणून लंडनच्या तिन्हींही गोलमेज परिषदांचा हजर राहिले. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अस्पृश्यांचे हितसंरक्षण करण्याच्या हेतूने त्यांनी इंडियन राऊंटेबल कॉन्फरन्सला मागण्या सादर केल्या.

१९२० च्या दशकाच्या अखेरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांचे राजकीय नेते बनले होते. इ.स. १९३२ रोजी ब्रिटिश मंत्रिमंडळाने पुणे करार मंजूर करून घेतला. त्यावर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले. मजुरांना, कामगारांना हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी इ.स. १९३६ मध्ये त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना, दलित शिक्षणसंस्थेची स्थापना, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून शिक्षणाची दारे खुली केली.



के. पी. खांडेभराड
सेवानिवृत्त मुख्याध्यापक
देऊळगाव राजा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे पक्के समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कायार्चा प्रभाव होता. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेल्या बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय संविधानात सिंहाचा वाटा होता. एवढे सूक्ष्म निरीक्षण असणारे आणि कोणावरही अन्याय न करता सर्वांना समान हक्क, अधिकार देणाऱ्या बाबासाहेबांच्या असामान्य बुद्धीची प्रचिती संविधानाच्या वाचनावरून, तरतुदींवरून येतेच.

## धर्मांतराची घोषणा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कोट्यवधी दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी दिवसरात्र झटत होते. हिंदू धर्मात आपल्याला समतेची वागणूक देण्यात यावी यासाठी त्यांनी मोठा लढा दिला. शेवटी हिंदू धर्म त्यागाचा म्हणजेच धर्मांतराचा निर्णय घेतला.

हिंदू धर्माचा त्याग केल्यानंतर कोणत्या धर्माचा स्वीकार करायचा, याबद्दल बाबासाहेबांनी सखोल विचार केला. हजारो कार्यकर्ते आणि अनुयायांचा बाबासाहेबांना पाठिंबा होता. अखेर बौद्ध धर्माचा बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली. या जयंती समारोहास अनेक देशांचे वकील/प्रतिनिधी, भिक्खू समुदाय व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता.

मार्च १९५९ च्या एका अहवालानुसार देशात १.५ ते २ कोटी अस्पृश्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. या घटनेची जागतिक इतिहासात नोंद झाली तर या घटनेने भारतात बौद्ध धर्म पुनर्जीवित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर जगात ऐतिहासिक होते. कारण ते जगातील सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर होते.

## महापरिनिर्वाण

नागपूर व चंद्रपूर येथील धर्मांतराचे कार्यक्रम उरकून आणि आता धम्मचक्र पुन्हा एकदा गतिमान झालेले पाहून बाबासाहेब आंबेडकर दिल्लीला परतले. २० नोव्हेंबर १९५६ मध्ये ते नेपाळमधील काठमांडूला 'वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्ट'च्या चौथ्या परिषदेस हजर राहिले.

आपल्या परतीच्या प्रवासात त्यांनी बनारसमध्ये दोन भाषणे दिली. दिल्लीमध्येही त्यांनी विविध बौद्ध समारंभात भाग घेतला. राज्यसभेच्या अधिवेशनात सहभागी झाले आणि आपल्या 'भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स' या पुस्तकाचे शेवटचे प्रकरण लिहून पूर्ण केले. ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीला निवासस्थानी त्यांचे महापरिनिर्वाण झाले.

■ ■ ■

# संविधान!!

समानतेचा मंत्र दिला
जगण्याची नवी आस
प्रत्येक स्त्रीच्या हृदयात
पेटविला नवीन श्वास

नारी शक्तीचा आधार
हक्काचा केला निर्धार
दलित शोषित नारी तू होती
अज्ञानाच्या अंधारी उभी होती
पुरुष सत्ताक जगात
स्वप्न तुझे धुळीत मिळवले
अंधार युगात भाग्य त्यांचे उजळविले

मतदानाचा अधिकार
संपत्तीतही वाटा दिला
पुरुषप्रधान संस्कृतीत
गौरव झाला
शिक्षणाचा हक्क दिला तुला
घे उंच भरारी आकाशाला

आत्मनिर्भरतीची तू
जगण्याची तू अधिकारणी
कष्टकरी नारी तू सावित्री
घरात आणि शेतात राबले
त्या श्रमाचे मोल कळाले
समान वेतनाचे हक्क मिळाले

अन्यायाविरुद्ध लढण्याची
शक्ती दिली
आत्मविश्वासाची
मशाल पेटवली
हे संविधान केवळ कागद नाही
क्रांतीची मशाल आहे
प्रत्येक हिंदू भगिनींसाठी
हक्काची ही ढाल आहे

डॉक्टर बाबासाहेबांचे
हे उपकार कधीही
न विसरणार नारी
त्यांच्या विचारांचा वसा
घेऊन आकाशी
घेई भरारी
*****
संज्योती

# मराठी गझलचे अनभिषिक्त सम्राट कवि सुरेश भट!

माणूस सहवासातूनच माणूस बनतो. कधी-कधी तर छोटीशी भेट देखील जीवनाचं आयामच बदलून टाकते. माणूस मरतो परंतू त्यांचे विचार मरत नसतात, ते त्यांच्या कार्यशैलीमुळे जीवित असतात. हे अधोरेखित सत्य आहे.

वरपांगी अत्यंत अस्ताव्यस्त दिसणारा हा कवी, त्यांची ती कविता आणि त्यांचे ते गाणे हे तिन्ही घटक त्या कवितेच्या संपूर्ण आस्वादाला आवश्यक असावेत असे वाटायला लागते.हे एक विलक्षण अद्वैत मिश्रण आहे. त्यांची कविता ऐकताना किंवा वाचताना सुरेश भट नावाचा एक मस्त कलंदर माणूस निराळा काढता येत नाही.



माझ्या सुदैवाने सुरेश भटांसारख्या सिध्दहस्त प्रतिभावंत कविचा स्नेह मला लाभला.त्यांचा तो बेडरपणा, दिलदारपणा, हळवेपणा, लोभसवाणा होता, कारण कविते-इतकेच त्यांचे कविता ऐकणाऱ्यावर, जीवनातल्या व्यवहारी धडपडीपलीकडे काही पाहू इच्छिणाऱ्यांवर, ते जाणून घेण्याची तळमळ असणाऱ्यांवर, माणसांच्या चांगुलपणावर प्रेम होते.

साधीसुधी ही माणसे माझ्या कवित्वाची धनी, असे ते केवळ उपचार म्हणून म्हणत नाहीत. त्या साध्यासुध्या माणसांशी साधायच्या संवादाचे त्यांना मोल मोठे वाटायचे. ओळखण्याची त्यांची हातोटी वेगळीच होती. सान असो वा मोठा सगळे सारखेच, त्यांच्या प्रेमात फारकत नव्हती. तेव्हा त्यांनी साप्ताहिक बहूमत नावाचे वर्तमानपत्र सुरु केले. त्यात माझा, जैमिनी कडु यांचा सहकारी म्हणून समावेश होता.

कविला माणसेच कवी म्हणून जगवतात व शिल्लक ठेवतात. कवी हा लिहिणारा माणूस असतो आणि बहुधा जीवन असे असते की ते कविला मनाप्रमाणे लिहू ही देत नाही अन् जगूही देत नाही. या जगात असच चालतं. कवितेच्या प्रांतात गझल सम्राट म्हणून कवी सुरेश भटांना असली आपुलकी लाभली, म्हणूनच तर नेहमी माणसांचा गोतावळा त्यांच्या अवतीभवती असायचा, त्यात मी सुध्दा सामील होतो.

***सजीव जो वरी लता देती***
***मरणा घेती खांद्यावरती...***

जीवन असतांना किंमत नसते, मरणानंतर त्याची महती कळते. अशा या थोर कवीचं नागपूर नगरीच्या महानगरपालिकेने त्यांचं स्मारक म्हणून कविवर्य सुरेश भट सभागृह बांधुन औचित्य साधलं. परंतू शासनाकडून एखादा सत्कार किंवा डॉक्टरेट वगैरे काहीही मिळाले नाही, त्याबद्दल अत्यंत वाईट वाटते. खरच ही शोकांतिका आहे. कवि सुरेश भटांची अनेक गीते चित्रपटासाठी आणि चित्रपटांशिवाय ध्वनिमुद्रित झालेली आहेत, त्यांच्या शब्दांना सुरसम्राज्ञी लता मंगेशकर, आशा भोसले, सुमन कल्याणपूर, देवकी पंडित, सुरेश वाडकर, अरुण दाते आणि नामवंत गायक-गायिकांचा सुरेख कंठ लाभलेला असून हृदयनाथ मंगेशकर, सी. रामचंद्र व बऱ्याच संगीतकारांचे त्यांच्या गीतांना संगीत लाभलेले आहे.



प्रभाकर सोमकुवर
नागपूर
9595255952

त्यामुळे त्यांच्या अनेक अविस्मरणीय रचना आजही अजरामर झालेल्या आहेत. ते हयात नसले तरी त्यांनी वेळोवेळी केलेले प्रामाणिक प्रयत्न कधीही विसरता येणे शक्य नाही. कविवर्य सुरेश भटांचे ऋण कधीच फिटणार नाहीत. तेव्हा त्यांच्या ऋणांच्या ओज्यात राहायला मला आवडेल! कविश्रेष्ठ सुरेश भटांच्या ९३ व्या वाढदिनानिमित्त त्यांच्या चिरंजीव स्मृतींना मानाचा मुजरा!!

***पटले न जगाशी माझे***
***साऱ्यांना नडलो आहे***
***मजलाच अचंबा वाटे***
***मी कैसे घडलो आहे...***

■ ■ ■

# आल्याचे सेवन आणि आरोग्याला चमत्कारी फायदे





निरोगी आरोग्यासाठी आहारामध्ये पोषक तत्वांचा समावेश करण्याची गरज असते. आहारामध्ये जंकफूडचा जास्त प्रमाणात समावेश केल्यामुळे आरोग्यावर गंभी परिणाम होतात.

निरोगी राहाण्यासाठी स्वयंपाकघरातील आल्याचा वापर करतात. आल्याचा वापर प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात केला जातो. चहामध्ये वापरण्यापासून ते अन्नाची चव वाढवण्यापर्यंत, ते अन्नाची चव सुधारण्यास देखील मदत करते. आल्यामध्ये जिंजेरॉल, शोगाओल्स आणि पॅराडोल्स सारखे जैविकदृष्ट्या सक्रिय संयुगे असतात जे त्यांच्या अँटिऑक्सिडंट, दाहक-विरोधी आणि जीवाणूविरोधी गुणधर्मासाठी ओळखले जातात.

आरोग्य तज्ञांच्या मते, आल्याचे सेवन केल्याने एक-दोन नव्हे तर अनेक फायदे मिळू शकतात. येथे आम्ही तुम्हाला आले खाण्याचे फायदे सांगत आहोत. जर आले पाण्यात उकळून त्याचा चहा दैनंदिनरित्या प्याला तर अनेक समस्यांपासून आराम मिळू शकतो. पण त्यात दूध आणि साखर घालण्याची गरज नाही, हवे असल्यास या चहामध्ये मध घालू शकता.

आल्याचा चहा पचनसंस्था मजबूत करण्यास मदत करतो आणि पचनाच्या समस्या देखील दूर ठेवतो. आले पाचक एंजाइम्सना उत्तेजित करून, पोटाचे कार्य सुधारून आणि पोटफुगी कमी करून पचनास मदत करते. अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असलेले आले अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. आले रंग सुधारण्यास, डाग कमी करण्यास आणि मुरुमांना देखील फायदेशीर ठरू शकते. त्यात अँटीऑक्सिडंट्स असतात जे मुक्त रॅडिकल्सशी लढतात आणि वृद्धत्व कमी करतात.

जर संतुलित आहार आणि नियमित व्यायामासोबत आल्याचा चहा घेतला तर वजन नियंत्रित राहण्यास मदत होऊ शकते. कारण आल्यामुळे चयापचय वाढतो, ज्यामुळे शरीरातील अतिरिक्त चरबी जाळण्यास मदत होते. म्हणून, आहारात या चहाचा नक्कीच समावेश करावा.

आल्यामुळे घसा आणि वायुमार्गात सूज कमी होते. आल्यामुळे किण्वन, बद्धकोष्ठता आणि पोटफुगी कमी होते. आल्यामुळे रक्त शरीरातील परिसंचरण सुधारते. ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)




# कोरडा दिवस ?

आहारी गेले जे मदिरेच्या
इतिहास त्याहीचा पहा ना
तिरस्काराचे बनले धनी
ज्वानीतच गेले स्मशाना ..!

नखितरावाणी बायको तुही
सोन्यावानी पोरं . .
काहून गड्या दारू पिऊन
करतो संसाराचं मातेरं . . !

येता पगार हाती
नशेत होतो बेभान
कुटूंबाचे हाल होती
समाज देईना सन्मान..!

लाख मोलाची तुही काया
नको लोळु भौ गटारी
दररोज पाळ ड्राय डे
सुखी राहशिल संसारी ..!














## आज का अंदाज

मंगळवार १५ एप्रिल २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| २३८ | १७८ | १०० | २३५ | १३९ | १५८ | १६० | १८९ |
| ५८० | ३५८ | ४५० | ३७० | २३८ | ३४७ | २५० | ४५९ |
| ६७० | ६०० | ३६० | ४६० | ३३७ | २४८ | ८९० | ३६९ |
| ३२ | ६२ | ९२ | ०१ | ३२ | ४२ | ७१ | ८१ |
| ३५ | ६५ | ९४ | ०४ | ३६ | ४६ | ७५ | ८५ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ | ३० | ४० | ७९ | ८९ |


१५ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६० | ९० |
| २४ | ५४ | ६८ | ९८ |
| २७ | ५७ | ६३ | ९३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## शब्दकोडे क्रमांक २०८५



**आडवे शब्द :–**
१) डोळे झाकून भिडू शोधण्याचा मुलांचा एक खेळ
६) स्वतःच्या मर्जीने
१०) संताप
११) दौत
१२) उपस्थित
१३) धोका
१५) हात पुसण्याचे छोटे वस्त्र
१७) दहावी तिथी
१९) परीक्षा घेणारा, तपासनीस
२१) नाजूक
२३) अधिक श्रेष्ठ
२५) सर्व, एकूणएक
२६) निर्नायकी स्थिती
२९) फणसाचा एक प्रकार
३१) सोने
३२) अडचणीत कसातरी चालविलेला संसार
३६) सध्या
३८) संगीतातील ठेका
३९) प्रफुल्लित
४०) जननी
४२) तारण
४३) महामार्ग
४५) अलमारी
४७) गतिमान
४९) ओळ
५०) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
५२) अरण्य
५३) नंतर
५४) आजच्या आधीचा दिवस
५५) धमकी
५७) दाट मैत्री
५८) अंगरखा
५९) उत्सवाचे दिवस
६१) नकला करणारा
६३) वजन
६४) गोव्याची राजधानी
६६) जमीनदार
६८) सिद्ध
६९) रंग
७०) वैरभाव, शत्रुत्व
७१) चांदी

**उभे शब्द: –**
२) देवांचा वैद्य
३) न वापरलेला
४) घोड्याचे बछडे
५) भविष्यकथनाचा एक प्रकार
६) पायापासून डोक्यापर्यंत
७) टपाल
८) रोज, सदोदित
९) तफावत
१३) एखादे जुने दुःख उकरून काढणे
१४) दानव
१६) फक्त, केवळ
१८) अंगावर येणारा काटा
२०) हात
२१) फार गरम वा थंड नसलेले (पाणी)
२२) आकडा, मांडी
२४) कमळ
२५) चंदनाचे खोड उगाळण्याचे साधन
२६) अवास्तव
२७) उग्र, अत्यंत तिखट
२८) काही काळापुरता, हंगामी
३०) साखरेचा रस
३३) वल्लरी
३४) फुलदाणी
३५) एक गुजराती नृत्यप्रकार
३६) कहाणीतील गाव
३७) संध्याकाळ
३९) कडक
४०) संगीतातील एक राग
४१) युद्ध क्षेत्र
४४) अंगातील मस्ती
४६) पारद
४८) नृत्यकलेचे दैवत
५०) मनाचा ओढा
५१) वाईट कृत्य
५३) चर्चा
५४) निमित्त, सबब
५६) स्वतःला
५८) मंत्रीमंडळ
६०) उपयोग
६२) छोटी मशाल
६३) स्तुती करणारा
६५) प्राण
६६) शपथ
६७) मातीचा कण

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | गा | चा | ती | ळ | पा | प | ड | हो | णे | | आ | | कुं | भ |
| गा | ढ | व | | | पा | न | | ती | | ह | त्या | कां | ड | |
| चे | | ट | प | ली | | व | स | न | वा | त | | च | ल | न |
| क्र | या | | त | | मा | ती | | व्ह | | ब | द | न | | |
| त | न | म | न | ध | न | | मा | ती | मो | ल | | मृ | ग | या |
| डे | | ग | | न | व | ल | | ति | | | त | ग | म | ग |
| क्र | न | | स | वा | | त | र | त | री | त | | | ना | |
| ढू | | अ | न | न | स | | | कि | | हा | त | | ग | वा |
| न | शा | | ग | | दा | | नि | के | त | न | | आ | म | टी |
| जो | | प | र | त | | सा | व | ली | | ले | न | दे | न | |
| डा | | र्ण | | | पां | ग | ळी | | क | ला | | श | | न |
| शि | रा | | ग | व | ग | वा | | द | मा | | न | | क | व |
| व | न | रा | ज | | | न | ज | रा | न | ज | र | | स | ल |
| णे | | स | रा | ई | त | | न | र | | व | म | न | | को |
| | गो | | ज | | प | व | न | | को | स | | र | त | ल |

> महत्त्वाचे

## आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**इंदिरानगर ।** येथील भारतीय जनता पार्टी प्रणित श्री प्रतिष्ठान, कै.धर्मराज बडोदे बहुउद्देशिय सेवाभावी संस्था यांच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक जयंती साजरी करण्यात आली. यावेळी डॉ.



बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे पूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग सहकार्यवाह राजेश राव, जेष्ठ स्वयंसेवक रघुनाथ कुलकर्णी, भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, भाजपा महिला आघाडीच्या रश्मी हिरे यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलित, शोषितांच्या मनात शिक्षणाचे महत्व रुजविले. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या हातात पुस्तके देऊन त्यांचे मन शिक्षणाकडे वळविले. त्यातून डॉक्टर, इंजिनियर, वकिल, शास्त्रज्ञ घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे व त्यांनी तयार केलेल्या राज्यघटनेमुळे देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होण्याची संधी अनेकांना मिळाली, असे मनोगत

जयंती उत्सवाच्या निमित्ताने वडाळागाव येथील जय हिंद वसाहतीगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य त्यात स्कूल बॅगचे वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच द बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे बुद्धचार्य आयु संजय आवारे यांनी बुद्धवंदना घेतली. यावेळी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गणेश ठाकूर, बाळासाहेब केंगे, शिवाजी काकड, प्रवीण जाधव, अॅड दिनेश देवरे, सुनील देवरे, अनिल निरभवणे, सुरेश पवार, अमित बुडूख, संजय डावरे, सुदाम पाटील, प्रकाश कोठावदे, जितेंद्र चोरडिया, विजय महाले, दत्तात्रय जाधव, प्रकाश जोशी, दीपक देव, प्रफुल्ल काजळे, बाळकृष्ण शिरसाट, डॉ. पुष्पा पाटील, डॉ राजेश पाटील, राजेंद्र परदेशी, शरद पाटील, सदाशिव उगले, धनराज चव्हाण, धनाजी घोडके, रामदास व्यवहारे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेकरिता श्री प्रतिष्ठानचे जयवंत टक्के, गोपाळ आव्हाड, आशिष दाभोळकर, भारत शिरसाट, योगेश रेवगडे, प्रशांत पाटील, मनिष पाटील, किरण पाटील, परेश पाटील, गणेश रत्नपारखी, सतिश यादव, गोकुळ फड, राम बडोदे, अजय बडोदे, विशाल बडोदे, उदय बडोदे, सुजित मोरे, तेजस वाघ, योगेश लगरे, प्रकाश सोनवणे, सोमनाथ सूर्यवंशी, प्रणव झळके, ईश्वर पवार, रुपेश शर्मा, अनिल दराडे, अजय शहाणे, मुन्ना शर्मा, नंदू फडके, सुभाष शेवाळे यांनी प्रयत्न केले. ,कार्यक्रमाचे आयोजन माजी नगरसेवक अॅड. श्याम बडोदे यांनी केले होते.

## विनामूल्य सहाय्यक उपकरणांसाठी नाव नोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक ।** भगवान महावीर जन्मकल्याणक दिन व उत्तर भारतीय प्रवर्तक प पू श्री आशीष मुनिजी म सा यांच्या ५२ व्या दीक्षा दिवसानिमित्त



राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणांसाठी विनामूल्य नावनोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले. सोमवारी (दि.१४) हे शिबिर झाले. यावेळी १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. महावीर धर्मार्थ हॉस्पिटल अध्यक्ष नंदलाल पारख यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्या म्हणून आ. देवयानी फरांदे उपस्थित होत्या. त्यांनी स्तुत्य उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. मंत्री विनोद कांकरिया, सहमंत्री निलेश भंडारी, सहकोषाध्यक्ष जितेंद्र लोढा, व कार्यकारिणी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी गरजू ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे उद्दिष्ट सफल झाले. सामाजिक न्याय मंत्रालय व एलिम्को यांच्या समन्वयाने व भारतीय जैन संघटना, मारवाडी युवा मंच नाशिक शाखेच्या सहकार्याने सोमवारी सकाळी १०.३० वाजेपासून श्री महावीर धर्मार्थ दवाखाना संचालित आरएमडी हॉस्पिटल, शिवसमर्थ नगर, आरटीओ ऑफिसजवळ, पेठ रोड नाशिक येथे नावनोंदणीला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी गरजूंच्या आवश्यकतेनुसार आधारासाठी काठी, वॉकर, व्हीलचेअर, श्रवणयंत्र, सिलिकॉन फोम उशी, नी ब्रेस, पाठीच्या कण्यासाठी आधार, मानेसाठी पट्टा अशा सहाय्यक उपकरणांचे विनामूल्य वितरण करण्यासाठी नावे नोंदवून घेण्यात आली. हे शिबीर सर्व गरजू ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी पूर्णपणे विनामूल्य होते. मुंबईचे डॉ. हर्षल बंब व सहकाऱ्यांनी मणके विकार तपासणी केली. नवकार आशीष सेवा ट्रस्ट तर्फे श्री महावीर जैन धर्मार्थ हॉस्पिटल येथे विनामूल्य डायलिसिस केंद्र सुरु करण्यात आले. या केंद्राला १ वर्ष पूर्ण झाले असून गोरगरीब रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे. सी. भंडारी यांनी केले. सतीश बोरा यांनी आभार मानले.

# महापालिकेच्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाच्या चौकशीचे धोंगडे भिजतच...

## आयुक्तांकडून सविस्तर चौकशीची 'मनीषा' कायम






दीपक भावसार
८३२९४६०२३०

**म**हापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमातील गैरकारभाराच्या रंगलेल्या खमंग चर्चेचे कवित्व अजूनही सुरूच आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू होऊनही या बहुचर्चित प्रकरणाची चौकशी अद्याप सुरू झालेली नसल्याने याबाबतच्या चर्चांना अधिक उत आला आहे. कार्यतत्पर आयुक्तांकडून या कथित प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींना शास्ती होईल, अशी बाळगलेली मनीषा अखेर फोल ठरली आहे.

गेल्या वर्षात महापालिकेचा महिला प्रशिक्षणाचा विषय यामध्ये झालेल्या गैरकारभारामुळे खूपच गाजला होता. टक्केवारीभोवती पिंगा घालणारे हे प्रकरण संबंधित ठेकेदार संस्था आणि अधिकाऱ्यांच्या हितसंबंधामुळे चांगलेच वलयांकित झाले होते. महिला, नागरिक, सेवाभावी संस्था-मंडळे यांच्याकडून या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याची मागणीने जोर धरला होता. याबाबत महापालिकेचे पार धिंडवडे निघाले होते. या विषयावर शहरात सर्वदूर चर्चा झडत होत्या. तरीही सारे काही नियमाप्रमाणेच झाले आहे, चौकटीतच झाले आहे, पारदर्शकप्रमाणेच झाले आहे, असे भरभक्कम समर्थन करीत संबंधितांनी वेळ मारून नेली. त्यानंतर महापालिकेच्या आयुक्तपदी मनीषा खत्री यांची नियुक्ती झाल्यावर या प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्याच्या मागणीने जोर धरला. आयुक्त मनीषा खत्री यांनी या प्रकरणाची सविस्तर व सखोलपणे चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचा शब्द दिला होता. तेव्हा आयुक्त नवनियुक्त होत्या. आता त्यांना तीन-चार महिने झाले आहेत. एव्हना त्यांना हा एकंदरीत विषय आणि त्याची व्याप्ती समजली असेल! त्यामुळे त्यांनी आता चौकशीचे घोडे पुढे दामटण्यास हरकत नसावी; पण तसे होत नसल्याने महिला व बालकल्याण प्रशिक्षणचा विषय पुन्हा चर्चेच्या रूपाने रुंजी घालत आहे. आता तरी आयुक्त या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन त्याची तड लावणार का याकडे शहरातील समस्त महिला वर्गाचे लक्ष वेधले आहे.

"येरे माझ्या मागल्या"... या उक्तीप्रमाणे महिला प्रशिक्षण कार्यक्रमाची दरवर्षी कुचर्चेने अवघ्या शहर, पंचक्रोशीत शोभा होत असते. महिला प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम कितीही स्तुत्य असला तरी टक्केवारीच्यात गर्तेत अडकल्याने तो गैरप्रकरणाच्या रांगेत अग्रणी जाऊन बसला आहे. महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातील संबंधितांपासून तर त्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या घटकांपर्यंत साऱ्यांकडेच संशयाची सुई फिरते. 7 कोटीचा ठेका विशिष्ट संस्थेलाच मिळावा यासाठी केली जाणारी, केली गेलेली धडपड हे त्याचे द्योतक आहे. संबंधित संस्थांनाच पुन्हा महिला प्रशिक्षणाचा ठेकाही त्यामुळेच मिळाला आहे, हे न कळण्याइतके नाशिककर नक्कीच दुधखुळे नाहीत. या महिला प्रशिक्षणाबाबत जर अनेकांच्या तक्रारी येत असतील तर त्या गांभीर्याने घेणे संबंधितांना आवश्यक वाटत नाही का, हा प्रश्न त्यामुळे उपस्थित होतो. इतर वेळा प्रत्येक बाबतीत नियमावलीची टीमकी वाजविणाऱ्या महापालिकेच्या प्रशासनाला हा प्रशिक्षण कार्यक्रम शासनाने ठरवून दिलेल्या नियम निकषनुसार होतो की नाही याची शहनिशा करण्याची आवश्यकता वाटत नाही का? संबंधित अधिकाऱ्यांकडून सर्व काम नियमात झाले आहे व होत आहे, असे सांगितले जाते. आम्ही वेळोवेळी प्रशिक्षण कामाची तपासणी, पडताळणी पहाणी केली. भेटी दिल्याचे संबंधितांकडून सांगितले जाते. असे असले तरी याबाबत तक्रारींचा ओघ मात्र जैसे थेच आहे. आयुक्त मनीषा खत्री यांनी गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व विभागांवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. त्यानुसार त्या वाटचाल करीत आहेत. त्यामुळे महिला प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत त्यांनी गांभीर्याने पाहावे आणि त्यातील दोषींवर कडक शास्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आयुक्त या महिला असल्याने त्यांनी सर्वसामान्य महिलांसाठी स्वावलंबनाचा वसा ठरलेल्या या महिला प्रशिक्षण कार्यक्रमाकडे गांभीर्याने पहायला हवे. जर सारेच नियमात झाल्याची टिमकी वाजविली जस्ट असेल तर होऊन जसु5द्या ना सविस्तर चौकशी! दूध का दूध आणि पानी का पानी होईलच की!

### सारे मॅनेज करणारे आहे तरी कोण?

महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या महिला प्रशिक्षण कार्यक्रमात संबंधित संस्था, त्यांची माणसं, मनपाचे अधिकारी आणि संबंधितांमध्ये मध्यस्थीची भूमिका करून सारं काही मॅनेज करणारे खास माणसं असल्याची महापालिका वर्तुळात खमंग चर्चा असून, हे मॅनेज गुरू नेमके कोण आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या महिला प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाच्या संपूर्ण प्रवासात अतिशय मोलाची आणि महत्त्वाची कामगिरी बजावणारे हे मध्यस्थ महाशय महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी, उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त व आयुक्तांपर्यंतही दुवा साधण्यात वाकबगार असल्याचे सांगितले जाते. यातील फायलींचा प्रवासही हेच घडवून आणत असल्याची चर्चा आहे. ही फक्त खरोखर चर्चाच असेल तर तो चर्चेचा विषय म्हणून तो नजरेआड करता येईल; परंतु तरीही प्रशासनप्रमुख या नात्याने आयुक्तांनी अशा बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे वाटते.

## समाज समंजस, सुजाण झाला तर आधाराश्रमाची गरज राहणार नाही : ज्येष्ठ अभिनेते सुनील बर्वे




**नाशिक ।** अनाथ बालकांचे संगोपन करणाऱ्या आधाराश्रम संस्थेतील बालकांची संख्या वाढू नये. संस्थेत अतुलनीय सेवाकार्य अखंडपणे सातत्याने सुरू आहे. येथील कर्मचारी आधारस्तंभ आहेत. येथे नकारात्मक वातावरणात सकारात्मक कार्य केले जाते याबद्दल समाधान वाटते. समाज समंजस, सुजाण झाला तर आधाराश्रम, वृद्धाश्रम यांची गरज राहणार नाही. असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते सुनील बर्वे यांनी केले.

कुसुमाग्रजांनी ज्या संस्थेचा मानवतेचे मंदिर म्हणून गौरव केला त्या आधाराश्रम संस्थेने सत्तर वर्षे पूर्ण केली आहेत. रविवारी (दि.१३) एक्काहत्तराव्या वर्धापनदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. लोकप्रिय ज्येष्ठ नाटक व चित्रपट अभिनेते सुनील बर्वे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजता संस्थेच्या घारपुरे घाटाजवळ असलेल्या इमारतीच्या प्रांगणात झाला. व्यासपीठावर अध्यक्ष प्रभाकर केळकर, उपाध्यक्षा सुनिता परांजपे, कार्यवाह कल्याणी दातार, हेमंत पाठक उपस्थित होते. प्रारंभी आश्रमकन्यांनी स्वागतगीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सुवर्णा दाबके यांनी करून दिला. हेमंत पाठक यांनी प्रास्ताविक केले.

वैद्य अण्णाशास्त्री दातार यांनी आपल्या मातोश्री लक्ष्मीबाई यांच्या प्रेरणेने सन १९५४ मध्ये आधाराश्रम या संस्थेची स्थापना केली. ही संस्था अनाथ, परित्यक्त व निराधार बालकांचे संगोपन करुन त्यांचे शिक्षण, पुनर्वसन करते. सध्या १०० पेक्षा जास्त मुले, मुली येथे राहतात. आधाराश्रमाला विशेष दत्तकविधान संस्थेचा दर्जा प्राप्त झाला असून केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. आजपर्यंत १ हजारांहून अधिक बालके दत्तक देण्यात आली आहेत. त्यातील काही परदेशी पालकांकडे सुपुर्द करण्यात आली आहेत. कार्यक्रमात उत्कृष्ट कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी, देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, देणगीदार, हितचिंतक यांच्या एकत्रित कार्यातून संस्थेने दीर्घ वाटचाल केली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिपाली पालेकर व कीर्ती थिटे यांनी केले तर समन्वयक राहुल जाधव यांनी आभार मानले. सर्व विश्वस्त व कार्यकारिणी सदस्य, देणगीदार, हितचिंतक व निमंत्रित मान्यवरउपस्थितहोते.

## एस. टी. कर्मचाऱ्यांचा उर्वरित पगार मंगळवारी होणार..!

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची यशस्वी मध्यस्थी



**नाशिक ।** एसटी कर्मचाऱ्यांना गेल्या महिन्याचे फक्त ५६ टक्के वेतन मिळाले होते. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची नाराजी होती. मेहनत करुन ही हक्काचा पगार मिळाला नाही. त्यामुळे महिन्याचं बजेट पूर्ण कोलमडलं. कुणाचे बँकेच हाफ्ते चुकले, तर कुणाची आर्थिक कोंडी झाली. इतर सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत आणि पूर्ण होता. मग एसटी कर्मचाऱ्यांनी काय घोडं मारलं, अशी प्रतिक्रीया उमटत होत्या. शेवटी सरकारने आता त्यावर तोडगा काढला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीन तोडगा काढण्यात आला आहे.

पूर्ण पगार न झाल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. गुरूवारी सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांची काही एसटी कर्मचाऱ्यांनी भेट घेतली. त्यांनी पगार झाला नाही ही बाब एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली. आपले उर्वरित वेतन लवकरच द्यावे, अशी मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल शिंदे यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे या महिन्याचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत देण्यात येईल असे गुप्ता यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. कर्मचाऱ्यांवरिल वेतन कपातीचे संकट दूर होण्यास मदत झाली आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित ४४ टक्के पगार येत्या मंगळवार पर्यंत देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी पुढाकार घेऊन वित्त सचिवांशी केलेल्या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन लवकरच अदा करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी महामंडळ तोट्यात असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे एसटीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण पडत आहे. खर्च जास्त आणि उत्पन्न कमी. त्यामुळे महामंडळाला राज्य सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावं लागत आहे. राज्य सरकारकडून मदत आल्यानंतरच पुढील प्रक्रिया होतात. अनेक वेळा पगार उशिरा होतात. तर कधी होतच नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे.

# संविधानाच्या नीतीमूल्यातूनच नव भारताची निर्मिती व सामाजिक समता प्रस्थापित : जिल्हाधिकारी





### समाजकल्याण विभाग सप्ताहाचा समारोप

**नाशिक ।** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात घालून दिलेल्या नीतीमूल्यामुळेच आजचा नवभारत निर्माण झाला आहे. या नीतीमूल्यांच्या आधारावरच समाजात सामाजिक समता प्रस्थापित झाली असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले.

समाजकल्याण विभागामार्फत दि. ८ ते १४ एप्रिल या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह राबविण्यात आला. १४ एप्रिल रोजी डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने सप्ताहाचा समारोप जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. भारतीय संविधानातील तरतुदीमुळे समाजातील सर्व घटकांचा सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक विकास झाला असून, त्यातूनच नव भारत निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांनी देखील बाबासाहेबांच्या या नीतीमूल्यांचा, विचार व कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केल्यास निश्चितच विद्यार्थी सर्व क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास आहे, असेही ते शेवटी बोलताना म्हणाले. यावेळी त्यांच्या हस्ते सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण नाशिक यांच्यावतीने कार्यालयात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ई-सुविधा कक्षाचे उदघाटन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाप्रसंगी समाजकल्याण विभागंच्या विविध योजनांचा लाभार्थ्यांचा, तसेच तृतीयपंथी यांना देखील प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना जात वैद्यता (पडताळणी) प्रमाणपत्राचे देखील वाटप करण्यात आला.

यावेळी समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त राकेश पाटील, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नाशिक देविदास नांदगावकर, जात पडताळणी समितीचे,संशोधन अधिकारी अधिकारी योगेश पाटील तृतीयपंथी समुदायाच्या गुरु सलमा आदी, लेखाधिकारी राजू पाटोळे, संजय सुसलादे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. सदर कार्यक्रम प्रसंगी एचपीटी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. विजयकुमार वावळे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयातील योगदान" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सामाजिक समता सप्ताह निमित्त राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा यावेळी सहाय्यक आयुक्त देविदास नांदगावकर यांनी अहवाल सादर केला. तर प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ यांनी सामाजिक समता सप्ताहाची भूमिका यावेळी स्पष्ट केली. यावेळी समाज कल्याण विभागाचे व विविध कार्यालयांचे अधिकारी कर्मचारी शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थिनी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवन कल्याण यांच्या रशियन पत्नीने तिरूमला येथे केले मुंडण, मुलासाठी केला होता नवस

**तिरूमला, दि. १४ वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्या पत्नीने मुलाच्या सुखरूप वाचण्यासाठी तिरूपती बालाजीला साकडे घातले होते. त्याची पूर्ती त्यांनी मंदिरात येउन पूर्ण केली. त्यांनी तिरूमला मंदिरात केस कापून मुंडण केले. यावेळी त्यांनी भगवान व्यंकटेश्वरांची मनोभावे प्रार्थना केली. यावेळी मंदिरातील अनेक धार्मिक कार्यक्रमांमध्येही त्यांनी सहभाग नोंदवला.



आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्या पत्नीने रविवारी तिरूमला मंदिरात आपले केस कापून मुंडण करत देवाला दिलेला शब्द पूर्ण केला. गेल्या काही दिवसांपूर्वी सिंगापूरमधील एका शाळेत आग लागल्याची घटना घडली होती. या घटनेत त्यांचा मुलगा जखमी झाला होता. त्याच्या सुरक्षेसाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी त्यांनी व्यंकटेश्वरा स्वामींकडे प्रार्थना केली होती. अन्ना कोनिडेला यांनी देवाप्रती आपली कृतज्ञतेच्या प्रतिकाच्या स्वरूपात आपले केस अर्पित करून व्यकेटेश्वराला धन्यवाद दिले.

कल्याण जोडप्याचा मुलगा मार्क शंकर सिंगापूरमध्ये एका समर कँम्पमध्ये सहभागी होण्यासाठी गेले होते. जिथे ८ एप्रिल रोजी आग लागली. या आगीच्या घटनेत त्याचे हात आणि पाय भाजले गेले आहेत. मात्र सुदैवाने त्याचा जीव वाचला होता. या दुर्घटनेत जखमी मुलाच्या सुरक्षेसाठी आणि आरोग्यासाठी अन्नाने तिरूमला मंदिरात केस अर्पण करण्याची प्रार्थना केली होती.

जनसेना पक्षाने जारी केलेल्या प्रेस रिलीजनुसार, उपमुख्यमंत्री कल्याण यांच्या पत्नी अण्णा यांनी मंदिराच्या परंपरेनुसार 'पद्मावती कल्याण कट्ट्यावर' आपले केस अर्पण केले. त्यानंतर त्या धार्मिक विधींमध्येही सहभागी झाल्या.

जनसेना पक्षाच्या प्रेस रिलीजमध्ये म्हटले आहे की, अण्णा कोनिडेला यांनी प्रतिज्ञा केली होती की जर त्यांचा मुलगा अपघातातून वाचला तर ती देवतेला आपले केस अर्पण करेल. अपघातात जखमी झाल्यानंतर आता त्यांचा मुलगा बरा आहे, त्यामुळे अण्णांनी आपले डोके मुंडण करून आपले व्रत पूर्ण केले आहे.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तत्वे स्वावलंबी भारताला चालना देतील : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेमुळेच आज देश सामाजिक न्यायाचे स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित वृत्तीने कार्यरत आहे. त्यांची तत्वे आदर्श, स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला बळ आणि गती देतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सोमवारी संसद भवन संकुलातील त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहिली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, डॉ. आंबेडकरांची तत्वे आणि विचार स्वावलंबी आणि विकसित भारताच्या निर्मितीला गती देतील. त्यांच्या प्रेरणेमुळेच देश सामाजिक न्यायाचे स्वप्न साकार करण्यासाठी समर्पित आहे.

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# म्यानमारला जाणारे भारताचे विमान हवेत असताना अज्ञातांकडून सायबर हल्ला

## पायलटच्या समयसूचकतेमुळे मोठा अनर्थ टळला

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

भारताच्या शेजारील देश म्यानमार भूकंपाने हादरला आहे. या भूकंपामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले असून अब्जावधी रुपयांची वित्तहानी झाली आहे. शेकडो घरं, इमारती कोसळल्या असून, हजारो लोक बेघर झाले आहेत. भूकंपग्रस्त भागात अन्नधान्याचा व वैद्यकीय सेवेचा तुटवडा आहे. त्यामुळे जगभरातून म्यानमारकडे मदतीचा ओघ सुरू झाला आहे. भारतानेही मदतीचा हात पुढे केला आहे. दरम्यान, भारतातून म्यानमारला मदत सामग्री घेऊन जाणाऱ्या विमानावर सायबर हल्ला झाल्याचं वृत्त समोर आलं आहे.

भारताच्या संरक्षण दलातील सूत्रांनी सांगितले की भारतीय हवाई दलाचं विमान सी-१३० मदत सामग्री घेऊन म्यानमारला जात होतं. त्याचवेळी या विमानावर जीपीएस स्पूफिंग हल्ला झाला. हल्लेखोरांनी या विमानाची नेव्हिगेशन प्रणाली हॅक करण्याचा (स्वतःच्या नियंत्रणात घेण्याचा किंवा विस्कळीत करण्याचा) प्रयत्न केला. हल्ल्याची जाणीव होताच त्या विमानाच्या वैमानिकाने ताबडतोब अंतर्गत नेव्हिगेशन प्रणालीवर स्विच केलं. वैमानिकाच्या शहाणपणामुळे मोठी दुर्घटना टळली.

गेल्या महिन्यात, २८ मार्च रोजी म्यानमारमध्ये ७.७ रिष्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला होता. यामध्ये ३ हजार ३४९ लोकांचा बळी गेला. तसेच या नैसर्गिक आपत्तीत ५ हजारांहून अधिक लोक जखमी झाले आहेत. भारताच्या शेजारील देशात प्रचंड मोठा विध्वंस झाला आहे. त्यामुळे म्यानमारला मदत करण्यासाठी भारताने ऑपरेशन ब्रह्मा हाती घेतलं आहे. याद्वारे भारत म्यानमारला सर्च ऑपरेशन (शोधमोहीम), मानवतावादी मदत, आपत्ती निवारण आणि वैद्यकीय सेवा यांसारखी मदत पाठवत आहे. भारतीय हवाई दलाची विमाने ही मदत सामग्री घेऊन म्यानमारला पाठवली जात आहेत. अशाच एका विमानावर रविवारी सायबर हल्ला झाला.

संरक्षण विभागातील सूत्रांनी सांगितलं की भारतीय हवाई दलाच्या विमानाने म्यानमारच्या हद्दीत प्रवेश करताच पायलटला संशय आला की विमानातील नेव्हिगेशन प्रणाली चुकीचा मार्ग दाखवत आहे. या प्रणालीवर सायबर हल्ला झाला असावा असा वैमानिकाला संशय आला. यालाच जीपीएस स्पूफिंग म्हणतात. विमानाची दिशा बदलतेय हे देखील त्याच्या लक्षात आलं. अशावेळी बॅकअप नेव्हिगेशन प्रणालीचा वापर केला जातो. वैमानिकाने ताबडतोब विमान या प्रणालीवर स्विच केलं.

या प्रणालीमुळे वैमानिक बाहेरच्या सिग्नलवर अवलंबून नसतो. त्यामुळे विमान भरकटण्याची शक्यता कमी असते. या बॅकअप प्रणालीच्या मदतीने वैमानिकाने विमान योग्य ठिकाणी नेलं आणि सुरक्षितपणे धावपट्टीवर उतरवलं. तसेच भारताने पाठवलेली मदत सामग्री तिथल्या प्रशासनाच्या ताब्यात दिली.

# अवकाळी पावसामुळे शेतकरी उद्ध्वस्त

**पुणे, दि. १४ प्रतिनिधी**

उत्तर पुणे जिल्ह्याच्या टोकावरील मढ बारागाव परिसरात अचानक अक्राळविक्राळ रूप धारण केलेल्या अवकाळी धुवाधार पावसाने व गारपिटीने सर्वच शेतकऱ्यांचे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याने या भागातील शेतकरी पुरता उध्वस्त झाला आहे.

शेतात काढून ठेवलेला कांदा अवकाळी झालेल्या पावसाने व गारपिटीने पूर्णपणे पाण्यात तरंगत असून तो नष्ट झाला आहे. सोबतच मिरची, टोमॅटो, बाजरी, आंबा, द्राक्ष आदी पिकांचे पूर्ण नुकसान झाल्याने या भागातील शेतकरी हतबल झाला असून येथील शेतकऱ्यांची शेती व्यवसायात तब्बल दहा वर्षे आर्थिक पिछेहाट झाल्याचे बोलले जात आहे, नुकसान झालेल्या पिकांचे शासनाने तात्काळ पंचनामे करून तातडीची आर्थिक मदत शेतकऱ्यांना द्यावी, अशी मागणी मढचे माजी सरपंच महेंद्र सदाकाळ यांनी केली आहे. रविवारी दिवसभर प्रचंड उकाडा जाणवत होता. दुपारी अचानक आकाशात ढग दाटून आले, सोसाट्याचा वादळी वारा वाहू लागला, मोठ्या थेंबाचा पाऊस आणि गारांचा खच यामुळे सर्वकाही होत्याचे नव्हते झाले. पावसाने इतका कहर केला की २४ तास उलटून गेले तरी सर्वच शेतांमधील गुडघाभर साठलेले पाणी ओसरायला तयार नव्हते.

# आईनेच व्हायरल केला मुलीचा अश्लील व्हिडीओ

**पुणे, दि. १४ प्रतिनिधी**

आईनेच स्वत:च्या मुलीचे अश्लील व्हिडीओ काढून ते पीडितेच्या मावशीला व अन्य नातेवाईकांना पाठवले. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर दोघांना बिबवेवाडी पोलिसांनी खडकवासला परिसरातून बेड्या ठोकल्या.


तीन महिन्यांपूर्वी अल्पवयीन मुलीने तिच्या आईविरोधात पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला होता. आईनेच मुलीचे व्हिडीओ रेकॉर्ड करून ते मावशीसह अन्य नातेवाईकांना आणि तिच्या प्रियकराला पाठवल्याचे तक्रारीत म्हटले होते. मुलीला आईच्या अनैतिक संबंधांबद्दल माहिती झाल्याने, तिने घरमालकाला याबाबत सांगितले होते. त्याचा राग मनात धरून आरोपी आईने असे कृत्य केल्याची माहिती सूत्रांनी दिली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक पोलिस आयुक्त धन्यकुमार गोडसे, बिबवेवाडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे उपनिरीक्षक अशोक येवले, पोलिस कर्मचारी रक्षित काळे, गायकवाड यांच्या पथकाने केली.

याप्रकरणी गुन्हा दाखल होताच आईने तिच्या प्रियकरासह शहर सोडले. पोलिसांनी तांत्रिक तपासावरून सोलापूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि दौंड परिसरात आरोपींचा शोध घेतला. मात्र, ते मिळून आले नाहीत. अखेर 10 दिवसांपूर्वी त्यांचे लोकेशन खडकवासला असल्याचे बिबवेवाडी पोलिस ठाण्याच्या तपास पथकाला समजले. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक केली.

# गुजरातच्या समुद्रात तटरक्षक दल व एटीएसची मोठी कारवाई, १८०० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**पोरबंदर, दि. १४ वृत्तसंस्था**

भारतीय तटरक्षक दल (आयसीजी) व गुजरात दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात केलेल्या एका संयुक्त कारवाईला मोठं यश मिळालं आहे. १२-१३ एप्रिलच्या रात्री भारतीय तटरक्षक दल व गुजरात एटीएसने समुद्रामार्गे तस्करी केली जात असलेला ड्रग्जचा मोठा साठा जप्त केला आहे. या कारवाईत ३०० किलोहून अधिक अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत, ज्याची किंमत तब्बल १,८०० कोटी रुपये इतकी असल्याचं सांगितलं जात आहे. यामध्ये मेथामफेटामाइन नावाचं ड्रग्स असल्याचा दावा काही प्रसारमाध्यमांनी केला आहे. आयसीजी व एटीएस याप्रकरणी अधिक तपास करत आहे.



आंतरराष्ट्रीय सागरी सीमेजवळ ही कारवाई करण्यात आली आहे. आयसीजीला गुजरात एटीएसकडून या तस्करीविषयी ठोस माहिती मिळाल्यानंतर पश्चिम किनाऱ्यावर देखरेख करण्यासाठी सज्ज असलेलं जहाज घेऊन आयसीजी व गुजरात एटीएसने कारवाई ही केली. अंमली पदार्थांची तस्करी करणारी आंतरराष्ट्रीय टोळी तटरक्षक दलाच्या हातून निसटली असली तरी त्यांनी अंमली पदार्थांचा मोठा साठा जप्त केला आहे.

**आयसीजीचे जहाज पाहून तस्करांनी अंमली पदार्थांचा साठा समुद्रात फेकून दिला**

या बोटीवरील तस्करांनी भारतीय तटरक्षकदलाचं जहाज त्यांच्या जवळ येत असल्याचं पाहिलं आणि त्यांनी त्यांच्याजवळील अंमली पदार्थांचा साठा समुद्रात फेकून दिला. तसेच बोट घेऊन ते सागरी सीमेच्या दिशेने निघाले. त्यांना भारताची सागरी सीमा ओलांडून पाकिस्तानच्या हद्दीत प्रवेश करायचा होता. मात्र, तटरक्षक दलाने त्यांची छोटी नाव समुद्रात उतरवली. त्या नावेवरील कर्मचाऱ्यांनी तस्करांनी समुद्राच्या पाण्यात फेकून दिलेले अंमली पदार्थ शोधले आणि जप्त केले. तर आयसीजीच्या जहाजाने तस्करांच्या बोटीचा पाठलाग केला. मात्र, तस्करांची बोट सागरी सीमा पार करून निघून गेली. त्यामुळे तटरक्षक दलाला पाठलाग थांबवावा लागला.

दरम्यान, समुद्रात शोधमोहीम हाती घेऊन तस्करांनी पाण्यात फेकलेले अंमली पदार्थ जप्त केले आहेत. हे अंमली पदार्थ तपासणी करण्यासाठी पोरबंदर येथे आणण्यात आले आहेत. गेल्या काही महिन्यांमधील आयसीजी व गुजरात एटीएसची ही १३ वी मोठी व यशस्वी कारवाई आहे. या कारवाईमुळे राष्ट्रीय सुरक्षा व सुरक्षेसाठी तैनात संस्थांमधील मजबूत भागीदारी सिद्ध होत आहे.

# कौटुंबिक न्यायालयात खटला दाखल करण्यापूर्वी सामंजस्य प्रक्रिया असावी - न्यायमूर्ती बी.व्ही.नागरत्न यांचा सल्ला

**नवी दिल्ली, दि. १४ वृत्तसंस्था**

सध्याच्या बदलत्या काळात अनेक कौटुंबिक वाद न्यायालयापर्यंत पोहोचतात. विशेषतः घटस्फोट आणि मालमत्ता वाटप यांसारख्या प्रकरणातही गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं चित्र पाहायला मिळतं. त्यामुळे भारतातील विविध न्यायालयांमध्ये अनेक खटले वर्षांनुवर्षे प्रलंबित असल्याचंही बोललं जातं. अनेक वर्षे प्रलंबित राहिलेले खटले ही न्यायव्यवस्थेसमोर एक आव्हान बनत चाललंय का? असा सवालही उपस्थित होतो. दरम्यान, या संदर्भात बोलताना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश न्यायमूर्ती बी.व्ही.नागरत्न यांनी एक महत्वाचा सल्ला दिला आहे.

'कौटुंबिक न्यायालयीन प्रकरणात खटला दाखल करण्यापूर्वी एक मध्यस्थ किंवा सामंजस्य प्रक्रिया अनिवार्य असावी', असं न्यायमूर्ती नागरत्न यांनी म्हटलं आहे. एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केलं आहे. कारण कौटुंबिक वाद हा न्यायालयात पोहोचण्याआधी सामंजस्य प्रक्रियेने सोडवला जाऊ शकतो म्हणून कौटुंबिक न्यायालयांमध्ये प्रशिक्षित मध्यस्थ किंवा निवृत्त न्यायाधीश मध्यस्थ अशी प्रक्रिया असली पाहिजे, असं मत त्यांनी व्यक्त केलं आहे.




"माझा सल्ला आहे की कौटुंबिक न्यायालयात खटला दाखल होण्यापूर्वी दोन्ही पक्षकारांसाठी एक सामंजस्य प्रक्रिया अनिवार्य असावी. जेणेकरून कौटुंबिक वाद या प्रक्रियेमुळे कमी होऊ शकतात. कारण कौटुंबिक वादामुळे अनेक कुटुंबात ध्रुवीकरण होते. महिलांची सामाजिक आणि आर्थिक मुक्तता हे वाढत्या वादांचे मूळ कारण नाही, तर सध्याच्या काळातील परिवर्तन स्वीकारण्याच्या सामाजिक दृष्टिकोनाचा अभाव हे त्या मागचं मूळ कारण आहे", असं त्यांनी म्हटलं आहे.

गेल्या दशकात ४० टक्के विवाह घटस्फोटाची अनेक प्रकरणे समोर आले आहेत. यामध्ये अनेक कुटुंब विभक्त झाले आहेत, असं एका माध्यमाच्या वृत्ताचा हवाला देत त्यांनी कौटुंबिक न्यायालयांमधील वाढत्या प्रकरणांचा मुद्दा उपस्थित केला आणि त्यावर आपलं मत व्यक्त केलं. भारतात वाढत्या कौटुंबिक वादाच्या घटनांना हाताळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयांची संख्या पुरेशी नाही. त्यामुळे न्यायालयीन हॉलमध्ये गर्दी होते आणि अपुऱ्या सेवा मिळतात, ज्यामुळे न्याय मिळण्यास विलंब होतो, असंही न्यायमूर्ती नागरत्न यांनी म्हटलं आहे.

# केसातील कोंडा समस्या आणि उपाय

**हॅलो डॉक्टर**

मानवी चेहऱ्याचं सौंदर्य खुलत ते डोक्यावरील केसांमुळे. व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्ती प्रमाणे प्रत्येकाची केशरचना हि निरनिराळ्या पद्धतीची असते. चेहऱ्याच्या सौंदर्याचा एक अविभाज्य भाग असलेल्या याच केसांचे आरोग्य सुधृढ राखण गरजेचं असत. परंतु अनेकांना केसांमध्ये उवा होणे,केस गळती होणे,केसांमध्ये चाई पडणे,किंवा टक्कल पडणे असे केसांचे विविध विकार होतात. यापैकीच अगदी सर्वसामान्य केसांचा विकार म्हणजे केसांमध्ये कोंडा होणे. केसांमध्ये कोंडा होण्याची कारण नेमकी काय असतात?आणि केसांच्या कोंड्यावर उपचार काय आहेत?या संदर्भात त्वचाविकार तज्ञ शैला मराठे यांच्याशी केलेली बातचीत.



१]केसातील कोंडा म्हणजे काय आहे?

केसांमध्ये कोंडा होणे हि त्वचेची एक स्थिती आहे,ज्यामुळे टाळूवरील त्वचेवर पांढऱ्या ते करड्या रंगांचे कोरड्या त्वचेचे थर बनतात. हि टाळूवरील त्वचेची एक सामान्य समस्या आहे,जी पुरुष आणि स्त्रियांमध्ये दोघांमध्येही समान परिणाम करते. हि व्यक्तीच्या सामाजिक जीवनावर परिणाम करणारी एक स्तिथी आहे पुरुषामध्ये कोंडा होण्याचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत जास्त आहे. जागतिक पातळीवरील लोकसंख्येच्या ५० टक्के पुरुषांमध्ये कोंडा होण्याची समस्या आढळते.

२]कोंडा होण्याची कारण नेमकी काय आहेत?

अनेकांना डोक्यामध्ये सूज असते किंवा खाजवणारी चिकट अशी त्वचा असते. अनेकांना कोरड्या त्वचेमुळे कोंड्याचा त्रास होतो. उन्हाळ्यामध्ये अनेक दिवस डोक्यावरून आंघोळ न केल्याने देखील केसात कोंडा होतो. शाम्पूचा अतिवापर, बुरशीजन्य संसर्ग,केसांच्या उत्पादनांची ऍलर्जी,पुरुषांमधील हार्मोन्सचा अभाव,डोक्यावर तेल लावणे, पक्षाघाताचा किंवा एचआयव्ही चा आजार असेल तरी डोक्यात कोंडा होतो.

३]डोक्यात कोंडा होण्याची सर्वसामान्य लक्षण काय असतात?

डोक्यावरील टाळूवरील त्वचेवर मृत त्वचेचे पांढरे,चिकट पापुद्रे येतात. टाळूवर खवले होणे आणि सतत डोक्यात खाज येणे,डोक्यात सौम्य जळजळ किंवा दाह होणे,डोळ्यावर,पापण्यांवर,आणि कानाच्या मागे पापुद्रे येतात. कोंडा सहसा टाळूवरील त्वचेवर होतो. त्यामुळे तो मोठ्या प्रमाणावर झाल्यास टायचे पापुद्रे खांदयावर पडतात.

४]डोक्यातील कोंड्यावर उपचार काय आहेत?

सर्वात महत्वाचं म्हणजे रोजच्या रोज थंड पाण्याने डोक्यावरून आंघोळ करायला हवी. ज्यांची त्वचा तेलकट असेल अशा लोकांनी डॉक्तरांच्या सल्ल्यानुसार औषधी प्रकारचा शाम्पू वापरावा. केसं शाम्पू करताना केसांच्या रेषेतून कोणतेही स्केल किंवा क्रिस्टो पँच हळुवारपणे काढून टाका. केसांचे स्क्रचिंग आणि स्क्रबिंग टाळा. केसाना वरचेवर थंड तेलाने मालिश करा. शिवाय नैसर्गिक मेहंदी लावल्याने देखील केसांमध्ये कोंडा होत नाही. आणि अगदीच जर जास्त प्रमाणात कोंड्याची समस्या असेल तर तज्ज्ञ त्वचाविकार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**लोकारोग्य**

# द प्रीमियर ग्लोबल न्यूट्रास्युटिकल समिटचे मुंबईत आयोजन

**आरोग्यनीती**

न्यूट्रिफाय टुडे ८-९ मे रोजी मुंबईतील ट्रायडंट आणि ओबेरॉय हॉटेल्समध्ये चौथे वार्षिक ग्लोबल सी-सुट समफ्लेक्स २०२५ आयोजित करणार आहे. न्यूट्रिफाय टुडेचे उद्दिष्ट मुंबईला दावोसप्रमाणे न्यूट्रास्युटिकल उद्योगाचे जागतिक केंद्र बनवण्याचे आहे. या कार्यक्रमात ब्रँडेड फॉर्म्युलेशन आणि घटक कंपन्यांचे अधिकारी, प्रसिद्ध वैद्यकीय डॉक्टर, आहारतज्ज्ञ आणि गुंतवणूक बँकर्ससह उद्योगातील ४०० नेते एकत्र येतील.

नियामक लँडस्केपबद्दल सखोल अंतर्दृष्टी प्रदान करतील.

हे शिखर परिषद व्यवसाय संधी, गुंतवणूक ट्रेंड आणि वैद्यकीय समुदाय आणि न्यूट्रास्युटिकल उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी धोरणात्मक चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करेल. हा कार्यक्रम भारताच्या नवीनतम अर्थसंकल्पीय घोषणेनंतर आहे, ज्यामध्ये न्यूट्रास्युटिकल संशोधनातील नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करून अन्न आणि कृषी पुरवठा साखळींमध्ये $1.1 अब्ज गुंतवणूक समाविष्ट आहे. हे निधी 2047 पर्यंत $100 अब्ज न्यूट्रास्युटिकल बाजारपेठ स्थापित करण्याच्या भारताच्या दीर्घकालीन उद्दिष्टाशी सुसंगत आहे, ज्यामुळे देश विज्ञान-चालित पोषणात जागतिक नेता म्हणून स्थान मिळवेल.

या वर्षीच्या आवृत्तीत सत्र नेत्यांची एक प्रतिष्ठित श्रेणी सादर केली जाईल. पिच पब्लिसिटीच्या संस्थापक आणि अध्यक्ष एमी समर्स गुंतवणूक सत्राचे नेतृत्व करतील, तर अनुभवी उद्योग व्यवसाय नेते डॉ. मुकुंद व्यवसाय विकास चर्चांचे निरीक्षण करतील. नियामक तज्ज्ञ डॉ. वैभव कुलकर्णी नियामक सत्राचे संचालन करतील आणि प्राध्यापक डॉ. पी.के. राजपूत हे शीर्ष वैद्यकीय डॉक्टरांसह वैद्यकीय सत्राचे नेतृत्व करतील. हे क्युरेटेड सत्र बाजारपेठेचा विस्तार, शाश्वत वाढ आणि विकसित होत असलेल्या

10th Annual NUTRITION™ INDIA SUMMIT 2025

# तुळशीची पानं

**आरोग्यम् धनसंपदा**

आपल्याकडे धार्मिक दृष्टिकोनातून तुळशीच्या रोपट्याला खूपच महत्व दिल गेलेलं आहे. अर्थात याच तुळशीचा आपल्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून देखील खूपच उपयोग आहे. तुळशीचे रोपटे आपल्या दारात असणे म्हणजे वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन हवा शुद्ध राहण्यास मदत होतेच परंतु अनेक शारीरिक व्याधींवर तुळस म्हणजे एक रामबाण इलाज आहे. म्हणूनच आयुर्वेदाच्या दृष्टीने तुळस एक महत्वपूर्ण औषध आहे.सध्या कोरोना सारख्या जीवघेण्या विषाणू मुळे संपूर्ण जग भयभीत झालेले असतानां शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी तुळशीची पानं खाणे उपयुक्त आहे. तुळशीच्या बियांमध्ये क्लेवोनाईड आणि फेलोनिक असल्याने आपल्या शरीरातील रोगप्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत होते. सर्दी पडशाचा आ जा र ा व र देखील तुळशीच्या पानांचा चहा हा अत्यंत गुणकारी आहे. तुळशीच्या पानांचा काढा करून प्यायला तरी सर्दी नाहीशी होते. तरुण तरुणींना चेहऱ्यावर मुरुमांचा जो त्रास असतो त्यावर देखील तुळस उपयुक्त आहे. तुळशीची पानं संत्र्याच्या सालीत मिसळून थोडे गुलाबजल टाकून एक लेप तयार केला कि हा लेप मुरुमांवर लावल्याने रक्त शुद्धीकरण प्रक्रिया होऊन मुरुम गायब होतात.अशी ही तुळस म्हणजे एक रामबाण औषधी आहे.



संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट; 8 जणांचा मृत्यू

**अनकापल्ली, दि. ११ वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशमध्ये फटाका कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. या घटनेत 8 जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. आंध्र प्रदेशमधील अनकापल्ली जिल्ह्यात अवैध पद्धतीनं सुरू असलेल्या फटाका कारखान्यात आज दुपारी अचानक भीषण स्फोट झाला, अनकापल्ली जिल्ह्यातल्या कोटावुराटमध्ये अवैध पद्धतीनं हा फटाका कारखाना सुरू होता. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलासह पोलीस तातडीनं घटनास्थळी पोहोचले, स्फोटमुळे कारखान्याला भीषण आग लागली होती. अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी या घटनेच माहिती घेतली, त्यांनी जिल्हा प्रशासन आणि पोलिसांना सूचना केल्या आहेत. बचाव कार्याची गती वाढवा, जखमींना तातडीनं वैद्यकीय मदत उपलब्ध करून द्या, असं चंद्रबाबू नायडू यांनी म्हटलं आहे. दुसरीकडे गृहमंत्र्यांनी देखील या दुर्घटनेची माहिती घेतली असून, ते क्षणा-क्षणाला घटनेबाबत अपडेट घेत आहेत. या दुर्घटनेत जे जखमी झाले आहेत, त्यांना चांगल्यातला चांगला उपचार उपलब्ध करून द्या अशा सूचना त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. तसेच या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांना आणि जे जखमी झाले आहेत त्यांना आर्थिक मदत दिली जाईल असंही गृहमंत्र्यांनी म्हटलं आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार अनकापल्ली जिल्ह्यातल्या कोटावुराटमध्ये अवैध पद्धतीनं हा फटाक्याचा कारखाना सुरू होता, आज दुपारच्या सुमारास या कारख्यान्यात भीषण स्फोट झाला. या घटनेत सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर दोन जण गंभीर जखमी झाले होते, त्यांना रुग्णालयात नेत असताना त्यांचा मृत्यू झाला आहे, या फटाका कारखान्यामध्ये तीसपेक्षा अधिक मजूर काम करत होते. यातील वीस लोकांना वाचवण्यात यश आलं आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. घटनास्थळी अजूनही बचावकार्य सुरु असून, या स्फोटामुळे पसिरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. हा स्फोट इतका भीषण होता की, भिंतीचे तुकडे जवळपास अर्धा किलोमीटर दूर उडाले आहेत.

# 17 वर्षांच्या मुलाला ट्रम्प यांची हत्या करून सरकार उलथवायचे होते, माय-बापालाही मारले

**विस्कॉन्सिन, दि. १४ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर निवडणूक प्रचारावेळी दोनदा जीवघेणा हल्ला झाला. पण या हल्ल्यातून ते सुदैवाने बचावले. असं असलं तरी त्यांच्यावरील धोका काही टळलेला नाही. राष्ट्रपती बनल्यानंतरही ट्रम्प यांना मारण्याचा प्लान झाला होता. संघीय वॉरंटमध्ये हा दावा करण्यात आला आहे. अमेरिकेतील विस्कॉन्सिन राज्यातील १७ वर्षाच्या निकिता कैसापवर राष्ट्रपती ट्रम्प यांच्या हत्येचा आणि त्यांचं सरकार उलथवून लावण्याचा आरोप करण्यात आला आहे. याच हेतूने त्याने आधी आपल्या आईवडिलांचीही हत्या केल्याचं या वॉरंटमध्ये म्हटलं आहे.

या धक्कादायक खुलाश्यानंतर अमेरिकेत खळबळ उडाली आहे. एक १७ वर्षाचा मुलगा जगातील सर्वात शक्तीशाली राष्ट्रपतीची हत्या करण्याची योजना कशी आखत होता? असा सवाल विचारला जात आहे. राष्ट्रपतीची हत्या करण्याच्या विचाराने त्याला एवढं पछाडलं होतं की त्याने त्याची आई आणि सावत्र बापाचीही हत्या केल्याचं समोर आल्याने अमेरिकेत चर्चांना उधाण आलं आहे. अनेक नागरिकांचा तर ही बातमी वाचून थरकाप उडाला आहे.

निकिता कैसापवर गेल्या महिन्यात वॉकेश काउंटीच्या अधिकाऱ्यांनी आरोप ठेवले होते. निकिताने त्याची आई तातियाना कैसाप आणि सावत्र वडील डोनाल्ड मेयर यांची हत्या करणे, चोरी करणे आणि इतर गंभीर गुन्ह्याचे त्याच्यावर आरोप ठेवण्यात आले होते. निकिताकडे अशा काही गोष्टी सापडल्या आहेत की त्यावरून तो नाझी समर्थक असल्याचं स्पष्ट होत आहे. त्याला अमेरिकेत मोठा बदल घडवून आणायचा होता, हे सुद्धा यावरून स्पष्ट होताना दिसत आहे.

२८ फेब्रुवारी रोजी पोलिसांना तातियाना आणि मेयरचा मृतदेह सापडला. मेयर कामावर गेले नसल्याचं आणि निकिताही दोन आठवड्यापासून शाळेत गेला नसल्याचं कळल्यावर या खुनाची माहिती समोर आली. पोलिसांनी दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले आहेत. पोलिसांच्या मते ११ फेब्रुवारी रोजीच दोघांची हत्या करण्यात आली होती. या दोघांचे मृतदेह इतके सडले होते की त्यांची ओळख पटवणे कठिण झाले होते. त्यांच्या दातांच्या सँपलवरून त्यांची ओळख पटवली गेल्याचं प्रॉसिक्युटरने कोर्टात कथितपणे सांगितलं होतं.

महासागर NASHIK Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com